सोमवार, ६ नोव्हेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ९१
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) MONDAY 6 NOV. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-91 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# किंग कोहलीचा शतकी विक्रम

## भारताने आफ्रिकेविरोधात 326 धावांचा डोंगर उभारला

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : विराट कोहलीच्या शतकाच्या बळावर भारताने आफ्रिकेविरोधात 326 धावांचा डोंगर उभारला. भारताने प्रथम फलंदाजी करताना 50 षटकात पाच विकेट्सच्या मोबदल्यात 326 धावांपर्यंत मजल मारली. विराट कोहलीने शतकी खेळी केली. त्याशिवाय अय्यरने 77 धावांचे योगदान दिले. कर्णधार रोहित शर्माने जबराट सुरुवात दिली तर रवींद्र जाडेजाने फिनिशिंगट टच दिला. ईडन गार्डन मैदानावर आफ्रिकेला विजयासाठी 327 धावांचे आव्हान आहे.**

रनमशी विराट कोहलीने ईडन गार्डन मैदानावर शतक ठोकले. या शतकासह विराट कोहलीने वनडेमध्ये सर्वाधिक शतक करणाऱ्या सचिन तेंडुलकरची बरोबरी केली. विराट कोहलीने अवघ्या 277 डावात 49 वे वनडे शतक ठोकले. सचिन तेंडुलकरला 49 वनडे शतकांसाठी 452 डाव लागले होते. भारताचा कर्णधार रोहित शर्मा याने वादळी सुरुवात करुन दिली. पण एकापाठोपाठ एक दोन धक्के



बसल्यानंतर विराट कोहलीने भारताचा डाव सावरला. विराट कोहलीने मैदानावर वर्चस्व गाजवले. विराट कोहलीने श्रेयस अय्यरच्या साथीने भारताच्या डावाला आकार दिला. विराट कोहलीने 119 चेंडूमध्ये शतक ठोकले. सुरुवातीच्या षटकात विराट कोहलीने संयमी फलंदाजी केली. चांगल्या चेंडूला मान देत विराट कोहलीने एकेरी दुहेरी धावसंख्या काढली. त्यानंतर वेगाने धावा केल्या. विराट कोहलीने आपल्या शतकी खेळीत 10 चौकारांचा समावेश आहे.

शुभमन गिल बाद झाल्यानंतर अय्यर मैदानावर आला. पण सुरुवातीला आफ्रिकन माऱ्यापुढे अय्यर चाचपडला. 30 धावा काढल्यानंतर अय्यरने फक्त दहा धावा केल्या होत्या. पण जम बसल्यानंतर अय्यरने फटकेबाजी केली. अय्यरने 87 चेंडूत 77 धावांची झंझावती खेळी केली. अय्यरने विश्वचषकातील तिसरे अर्धशतक ठोकले. अय्यरने आपल्या अर्धशतकी खेळीमध्ये दोन षटकार आणि सात चौकार लगावले. अय्यर आणि विराट कोहलीने भारताच्या डावाला आकार दिला. दोघांमध्ये चौथ्या विकेटसाठी 158 चेंडूत 134 धावांची भागीदारी झाली.यामध्ये विराट कोहलीचा वाटा 49 तर अय्यरचा वाटा 77 इतका होता.

कोलकात्याच्या ईडन गार्डन मैदानावर भाराचा कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी घेतली. रोहित शर्माने पहिल्या चेंडूपासूनच आफ्रिकन गोलंदाजांविरोधात हल्लाबोल केला. रोहित शर्माने गिलच्या साथीने पहिल्या विकेटसाठी 35 चेंडू 62 धावांची भागीदारी केली. रोहित शर्माने आफ्रिकन गोलंदाजांचा समाचार घेत वेगाने धावसंख्या वाढवली. रोहित शर्माने अवघ्या 24 चेंडूमध्ये 40 धावांचा पाऊस पाडला. या खेळीत रोहित शर्माने सहा चौकार आणि दोन षटकार ठोकले. रोहित शर्मा बाद झाल्यानंतर भारताची धावसंख्या संथ झाली. त्यातच शुभमन गिल बाद झाला. शुभमन गिल याला चांगली सुरुवात मिळाली होती, पण त्याला मोठी खेळी करता आली नाही. शुभमन गिल 24 चेंडूत 23 धावा काढून बाद झाला. गिल याने या खेळीत चार चौकार आणि एक षटकार मारला. गिल आणि रोहित शर्मा बाद झाल्यानंतर भारताच्या धावांची गती अतिशय संथ झाली. दहा षटकात फक्त एक चौकार मारता आला होता. पण त्यानंतर अय्यर आणि कोहलीने वेगाने धावा काढल्या.

# महिला पूरक धोरणामुळे मुलींचा जन्मदर सुधारला

आधुनिक केसरी न्यूज

**रायगड :** सरकारच्या महिला पुरक धोरण, कायदा तसेच लेक लाडकी सारख्या योजनांमुळे राज्यातील मुलींचा जन्मदर ९२९ वरून ९६८ पर्यंत सुधारला आहे. यात अधिक सुधारणा करण्यासाठी गर्भलिंग निदान चाचणी विरोधी कायद्यांची कठोर अमंलबजावणी व्हायला हवी, असे मत विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी व्यक्त केले.

निलम गोऱ्हे अलिबाग येथे शिवसेना महिला आघाडीच्या वतीने आयोजित उद्यम सखी दिवाळी महोत्सवात बोलत होत्या. यावेळी आमदार महेंद्र दळवी, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य मानसी दळवी, आदिती दळवी, महिला जिल्हाप्रमुख शुभांगी करडे तसेच रायगड जिल्हा महिला संघटिका प्रा संजीवनी नाईक, कामगार नेते दिपक रानवडे, महिला आघाडी तालुका प्रमुख स्मिता चव्हाण, संकेत नाईक आदी उपस्थित होते.

उपसभापती नीलम गोऱ्हे पुढे म्हणाल्या की, उद्यम सखीच्या माध्यमातून पर्यटकांना बाजारपेठ मिळावी यासाठी अलिबागमधील महिला कौतुकास्पद काम करत आहेत. त्यामुळे अलिबागमध्ये महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला कायमस्वरुपी सुविधा केंद्र उपलब्ध व्हावे यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

आमदार महेंद्र दळवी यांनी आपल्या मनोगतात, केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना महिलांपर्यंत पोहचविण्याची गरज आहे. महिलांचे मनोबल वाढविण्याचे काम अशा मंचातर्फे केले जाईल, अशी ग्वाही दिली. महिलांमध्ये अनेक उद्योजिका आहेत पण त्यांना पाठबळ मिळत नाही. प्रत्येक तालुक्यात अशा प्रकारचे व्यासपीठ महिलांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे दळवी यांनी यावेळी सांगितले. त्याप्रसंगी अलिबागचे नाव कलाक्षेत्रात साता समुद्रापार नेलेल्या कलाकार चंद्रकला कदम यांचा तसेच वात्सल्य ट्रस्टच्या संचालिका शोभा जोशी आणि महिला उद्यम ग्रुपचा गौरव नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते करण्यात आला. प्रस्तावना प्रा संजीवनी नाईक, सूत्रसंचलन प्रतीम सुतार तर आभारप्रदर्शन दिपक रानवडे यांनी केले.

# काँग्रेसच्या नेत्यांकडे अमली पदार्थांचे लायसन्स

## वनमंत्री सुधीर मुनगंटीवारांचा दावा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ड्रग्ज व्यवसायात कोणत्याही नेत्याचा संबंध असो, त्याला ठेचून काढलंच पाहीजे असे वक्तव्य राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले. जे आमदार, खासदार होतील, त्यांच्या कुटुंबात अमली पदार्थांचं लायसन्स असता कामा नये. काँग्रेसच्या नेत्यांची मी यादी देऊ शकतो ज्यांच्याकडे असे लायसन्स आहेत असेही मुनगंटीवार म्हणाले. दरम्यान, ड्रग्ज विषयात कोणत्याही प्रकारचे राजकारण होऊ नये असेही सुधीर मुनगंटीवार म्हणाले. अजित पवार यांच्या मुख्यमंत्री पदाच्या इच्छेबाबात मुनगंटीवार यांनी विचारण्यात आले. त्यावेळी ते म्हणाले की, एखाद्या नेत्याने मुख्यमंत्री व्हावे ही इच्छा व्यक्त करण्यात गैर काहीच नाही.

अपात्रतेच्या सुनावणीत काही अघटीत घडायचेच असेल तरी त्याचा मुख्यमंत्रीपदाशी काहीच संबंध नाही. देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलेच आहे की विधानपरिषदेचा मार्ग मोकळा आहे. एकनाथ शिंदेंच्याच माध्यमातून 2024 च्या निवडणूका लढवणार असल्याचे मुनगंटीवार म्हणाले.

मंत्रीमंडळाचा विस्तार चाय पे चर्चा करुन होत नाही, अमितभाई, मुख्यमंत्री आवश्यक असेल तिथे देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांची मदत घेऊन मंत्रीमंडळ विस्तार होईल असे मुनंगटीवार म्हणाले. राज्यातील सत्ता संघर्षाबाबत बोलताना मुनगंटीवार म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने अमुक एका बाजूने निर्णय द्या, असे सांगितले नाही. निर्णय वेगाने व्हावा ही सर्वसामान्यांची भावना असू शकते असे मुनंगटीवार म्हणाले.

जो हारणारा असतो तो निवडणुकीत प्रतिस्पर्ध्यावर पैसे वाटण्याचा आरोप करतोच. भाजपचा कोणी कार्यकर्ता काटेवाडीत प्रतिस्पर्ध्यावर पैसे वाटत असल्याचा आरोप करत असतील तर तो हारणारा असेल. आम्ही जर प्रतिस्पर्ध्यावर पैसे वाटत असल्याचा आरोप करत असु तर पराभवाच्या मानसिकतेत जात असू असे मुनगंटीवार म्हणाले. मी एक प्रस्ताव तयार करतोय की सर्व जातीच्या प्रमुखांना एकत्र घेऊन आपापल्या जातीच्या माध्यमातून विकास आराखडा तयार करायचा असल्याचे मुनगंटीवार म्हणाले.

# फडणवीसही मुख्यमंत्रीपदाच्या योग्यतेचे नाहीत का : सुषमा अंधारे

आधुनिक केसरी न्यूज


**पुणे :** अजित पवार हे मुख्यमंत्री व्हावेत अशी इच्छा त्यांच्या आईने व्यक्त केली आहे. त्यावर शिंदे गटाचे नेते दीपक केसरकर यांनी अजित दादा यांना मुख्यमंत्री व्हायला त्यांचे वय अजून खूप लहान आहे, असे विधान केले. केसरकर यांच्या या विधानाचा ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी समाचार घेतला आहे. अत्यंत कमी वयात फार मोठमोठे पराक्रम करणाऱ्यांची या राज्याला आणि देशाला मोठी परंपरा आहे. त्यामुळे वय हा मुद्दा कधीही येत नाही. वय हाच मुद्दा लावायचा असेल तर मग देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले होते तेव्हा त्यांचे वय किती होते? याचा विचार केसरकर यांनी केला पाहिजे. ते फडणवीस यांनाही मुख्यमंत्रीपदाच्या योग्यतेचे समजत नाही का याचेही उत्तर त्यांनी दिले पाहिजे, असा सवाल सुषमा अंधारे यांनी केला आहे. सुषमा अंधारे मीडियाशी संवाद साधत होत्या.



सुषमा अंधारे यांनी यावेळी वकील गुणरत्न सदावर्ते यांच्यावरही टीका केली. गुणरत्न सदावर्ते यांनी एसटी बंदची हाक दिली आहे. त्यापार्श्वभूमीवर अंधारे यांनी टीका केली आहे. सदावर्तेंना आता लोक स्वीकारतील का हा खरा प्रश्न आहे. सदावर्ते दिवाळीच्या तोंडावर आंदोलन करत आहेत ही एक खेळी आहे. मराठा आरक्षणाच्या संदर्भात जे वातावरण तयार झाले, त्यात निव्वळ मी फडणवीस यांचा माणूस नाही हे सांगण्याचा भाबडा प्रयत्न सदावर्ते करत आहेत, असा दावा सुषमा अंधारे यांनी केला आहे.

**मनमानी करता येणार नाही :** सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी केलेल्या विधानावरही त्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. चंद्रचूड यांची टिप्पणी योग्य आहे. सुप्रीम कोर्टाचे निर्णय अभिलेखासारखे असतात. त्याला कायद्याचे स्वरूप्राप्त होते. पार्लमेंट मधला एखादा कायदा चौकटी बाहेर जात असेल तर त्यावर टिप्पणी करण्याचा अधिकार सुप्रीम कोर्टाला असतो. विधिमंडळाने तर सर्वोच्च न्यायालयाचे ऐकलेच पाहिजे. विधिमंडळाने केलेला एखादा निर्णय सुप्रीम कोर्टाच्या अधीन राहूनच असतो.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

या आक्रमकांनी ही नगरी तर जिंकलीच पण या या सुंदर नगरीची कमालीची दुर्दशा केली. तीन महिने हे शहर लुटले जात होते. आक्रमकांनी या शहरातील सुंदर प्रासाद, देवळे, उत्तम वास्तुशिल्पाचा नमुना असलेली घरे तोडफोड आणि जाळपोळ करून उध्वस्त केली. राजप्रासादांना आगी लावल्या. आज आपण जे हंपी पाहतो ते म्हणजे या सगळ्यांचे उरलेले भग्नावशेष. या आक्रमकांच्या हल्ल्यातून वाचले ते अत्यंत देखणे असे विरुपाक्ष मंदिर. हा एक आश्चर्यकारक योगायोग. हे विरुपाक्ष मंदिर म्हणजे त्या काळातील भाविकांचे आणि पर्यटकांचे प्रमुख आकर्षण होते. वैभवशाली विजयनगर साम्राज्याचा उदय आणि अस्त यांचे हे मंदिर मूक साक्षीदार आहे. आज इतक्या वर्षांनंतरही आपल्याला हे मंदिर पाहताना ते गतकाळातील वैभवाची साक्ष देते. त्या काळातील स्थापत्य, शिल्पकला, मूर्तिकला किती प्रगत आणि विकसित होती याची जाणीव पाहताना होते. या मंदिराचे पूर्वेकडील गोपुर १०५ फूट उंच म्हणजे जवळपास दहा मजली इमारतीएवढे उंच आहे. त्यावर विविध प्रकारच्या मुर्त्या, नक्षीकाम आणि देखावे कोरलेले आहेत. मंदिराच्या मध्यभागी एक विशाल असे प्रांगण आहे. त्यातही अनेक देखणी गोपुरे आहेत. नक्षीकाम केलेलेआणि अलंकारांनी सुशोभित केलेले शंभर दगडी खांब आहेत. अलंकृत असा भव्य नंदी आहे. त्यावर आरूढ अशी गिरिजाशंकराची मूर्ती आहे.

राम, विष्णू आणि भगवान शंकरांच्या अवतारांच्या अनेक कथा कोरीव कामातील शिल्पातून साकार झाल्या आहेत. या परिसरात मंद स्वरात दाक्षिणात्य पद्धतीचे सनई चौघड्याचे छान संगीत ऐकायला येते. पूर्वेकडील गोपुरातून आतमध्ये प्रवेश केल्यावर डाव्या बाजूला एका कोपऱ्यात अत्यंत सुशोभित असा एक गजराज आपल्याला दर्शन देतो. अनेक भाविक त्याची पूजा करतात.



## आनंदी पहाट

## देवत्वाचे जाज्वल्य वयोवृद्धांमध्ये शोधावे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

देखल्या देवाला दंडवत घालणारे संख्येनं खूपच कमी असतात, हे विधान किती जण मान्य करतील? त्या विधानाशी कितीजण सहमत असतील? आम्ही देखल्या देवाला दंडवत घालत नाही, आम्ही देवाला मनोभावे नमस्कार करतो, असं म्हणणारे किती असतील? अनेकदा आपल्याला रस्त्यावरून वाहनातून, वाहनावरून अथवा पायी जाणाऱ्या व्यक्तीच्या देवळातील देवाला नमस्कार करण्याच्या तऱ्हा बघितल्या कि आश्चर्य वाटायला लागतं. ती व्यक्ती देवाला नमस्कार करताना नक्की काय करत आहे, ह्याचा थांग पत्ता लागत नाही. अशा व्यक्ती देव मानतात म्हणून नमस्कार करत असतात, कि आपण नमस्कार करताना कोणी बघून काही म्हणणार तर नाही ना, ह्या दडपणाखाली तो नमस्कार उरकत असतात? तो द्राविड प्राणायाम कशासाठी करायचा असतो? त्याबाबतीत हेच काही कळत नाही. काही जणांच्या बाबतीत मात्र चित्र उलटं असल्याचं दिसून येतं. त्यांचा इतका देव देव सुरु असतो, कि काही वेळा असं वाटतं ही मंडळी त्याशिवाय दुसरं काही करत असतील कि नाही अशीच शंका येऊ लागते. ह्या मंडळींना देवळातल्या देवामध्ये जाज्वल्य शोधावं असं वाटत असतं पण घरातल्या देवतुल्य ऋषितुल्य कौटुंबिक सदस्यांमध्ये दिसू शकत नाही. अशी मंडळी देऊळ बांधून, त्यांत मूर्ती बसवून त्यात देवत्व शोधायचा केविलवाणा प्रयत्न करत असतात. पण घरातल्या जिवंत, चालत्याबोलत्या देवाला मात्र वृद्धाश्रमात दाखल करतात. का बरं असं होत असतं? घरातल्या वयोवृद्ध व्यक्तीमध्ये देवत्वाचा चमत्कार दिसत नाही, कि तसा कोणताही त्यांच्याकडून दाखला मिळत नाही, म्हणून त्यांची वृद्धाश्रमात रवानगी केली जाते.



आधुनिक केसरी

**त्रैलोक्यीचा राजा | पंढरीत ||**

एक रूप पाहु | एक गाऊ नाम ||
एक हरिनाम | बोलु वाचे ||१||
एकनिष्ठ भाव | एक चित्ती वसे ||
एक तोचि दिसे | विटेवरी ||२||
एकमेका देऊ | एक प्रेम भाव ||
एक दिंडी ठाव | पांडुरंग ||३||
एक ज्ञाना तुका | एक संतजन ||
एक आलिंगन | विठ्ठलासी ||४||
एक तुझा माझा | नसे अन्य दुजा ||
त्रैलोक्यीचा राजा | पंढरीत ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी


संसार हाचि दुःखमूळ ।लागती दुःखाचे इंगळ ।
मागां बोलिली तळमळ ।गर्भवासाची ॥१॥
गर्भवासीं दुःख जालें ।तें बाळक विसरलें ।
पुढें वाढों लागलें ।दिवसेंदिवस ॥२॥
बाळपणीं त्वचा कोंवळी ।दुःख होतांचि तळमळी ।
वाचा नाहीं तये काळीं ।सुखदुःख सांगावया ॥३॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

जिवन्मुक्त गुरु आप्त में, सत्य ज्ञान जग आय । धार ईश्वरी मिल रहा, जग जीवन पथ पाय ।।११।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल द्वितीय अध्याय) ०२/०२/११

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :

जिवन्मुक्त आप्त सद्गुरूंमध्ये ईश्वरीय ज्ञानधारा प्रवाहित होते, ज्यायोगे जगाला सत्य ज्ञानाची प्राप्ती होते आणि त्यामुळे जगजीवांचे पथ-प्रदर्शन होते.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## संत मुक्ताबाई

आधुनिक केसरी



ज्ञानदेवांनी ताटीचे दार उघडले आणि त्यानंतर आयुष्यात त्यांच्या हातून अलौकिक कार्य घडले. ज्ञानदेवांच्या अलौकिक कार्याला श्री निवृत्तीनाथांची कृपा आणि मुक्ताबाईंची धेयस्वप्नांची जाणीव होती. समाजाभिमुख आणि अत्यंत अर्थपूर्ण अशी मुक्ताबाईच्या अभंग रचना आहेत. मुक्ताबाईंनी ताटीचे अभंग लिहिले त्याचप्रमाणे हरिपाठाचे सुद्धा अभंग लिहिलेत.

**“अखंड जायला देवाचा शेजार कारे अहंकार नाही गेला | मान अपमान वाढविसी हेवा दिवस असता दिवा हाती घेसी ||”**


मुक्ताबाईंचे विचार फार साधे मात्र परखड होते. मराठीतील पहिल्या कवयित्री म्हणून आज देखील त्यांचा नामोल्लेख होतो. मुक्ताबाईंनी ‘ज्ञानबोध’ या ग्रंथाचेही लेखन केले आहे. ह्या ग्रंथामध्ये संत निवृतिनाथ आणि संत मुक्ताबाई ह्यांचा संवाद आलेला आहे.

संत ज्ञानदेवांनी समाधी घेतल्यानंतर ज्येष्ठ बंधू निवृतिनाथ मुक्ताबाईंना घेऊन तीर्थयात्रा करण्याकरता निघाले. ते तापी नदीवर आले असता अचानक वीज कडाडली. संत मुक्ताबाई प्रचंड विजेच्या प्रवाहात लुप्त झाल्या (१२ मे १२९७). मुक्ताबाईंची समाधी जळगाव जिल्ह्यातील कोथळी येते आहे.

## सर्व दु:खांचे मूळ देहबुद्धी आहे

आधुनिक केसरी

परमार्थाचा विषय तसा खरोखरच कठीण आहे, आणि सर्वांना नडणारा आहे. ज्याला हा विषय जाणून घ्यायचा असेल त्याला, मी कोण हे जाणण्यापेक्षा, मी कोण नव्हे हे जाणणे महत्त्वाचे आहे. एखाद्या पाऊलवाटेने जात असताना ती वाट चुकलो आणि आपण भलत्या मार्गाला लागलो तर त्यापुढला सर्व व्यवहार चुकत जाणार. एखादे गणित सोडविताना एखाद्या आकड्याची चूक झाली की त्यापुढले सर्व गणित चुकत जाते किंवा, एखाद्या रोगाचे निदान बरोबर झाले नाही तर मग त्या रोगावर केलेली औषधयोजना फुकट जाते, त्याप्रमाणे, मनुष्याच्या सर्वसामान्य गुणधर्मांचे आकलन जर बरोबर झाले नाही, तर या गुणधर्मावर आधारलेला परमार्थाचा मार्गही जाणणे फार कठीण गोष्ट होईल. आपण आनंदी असावे, नेहमी आनंदात रहावे, असे सर्वांनाच वाटते; हा झाला पहिला गुणधर्म. या आनंदात चिरंतन असावे, निदान आनंदाच्या अपेक्षेत तरी चिरंतन रहावे, असेही आपल्याला वाटते. खरे म्हणजे मरण कुणालाच आवडत नाही; जगण्याची हाव किंवा चिरंतन राहण्याची आवड आपल्या



सर्वांनाच असते. परमेश्वर आनंदरूप आहे, तो चिरंतन आहे. आपल्या ठिकाणी तो अंशरूपाने असल्यामुळे आपल्यालाही तसे राहणे साहजिकच आवडते. पण आपली मुळात वाट चुकली, आणि म्हणून त्यापुढले सर्व व्यवहारही चुकत गेले. एखाद्याच्या परसातले झाड पडल्यावर तो 'माझे झाड पडले' असे म्हणतो, परंतु त्याचा देह पडल्यावर 'त्याचे शरीर पडले' असे नाही आपण म्हणत, 'तो मेला' असे म्हणतो. म्हणजेच मुळात चूक ही की, आपण स्वतःला देह समजूनच राहतो. देह माझाच समजून त्याच्यावर प्रेम करतो, ही आपली पहिली चूक. नंतर, या देहाचा गुणधर्म म्हणजे विकार आपल्याला चिकटल्यावर, त्यांचीच जोपासना करतो, ही दुसरी चूक. एकदा हे विकार चिकटल्यावर, त्यांची वाढ न थांबविता, ते नेतील तिकडे त्यांच्या पाठीमागे जाणे, आणि त्याकरिता वेळप्रसंगी आपली बुद्धीही गहाण टाकणे, ही तिसरी चूक. अशा रीतीने चुकांनी चुका वाढत जाऊन आयुष्याचे गणित मग साफ चुकते. एखादे झाड तोडायचे असेल तर प्रथम त्याच्या फांद्या तोडाव्या लागतात, आणि नंतर बुंधा तोडतात; तसे, नीतिधर्माने वागणे म्हणजे देहाला लागलेल्या विचाराच्या फांद्या तोडण्याप्रमाणेच आहे, दुसरी योजना म्हणजे सगुणभक्तीची. सगुणभक्ती करताना माणूस क्षणभर का होईना स्वतःला विसरतो, आणि 'मी तुझा आहे' असे म्हणतो. या भगवंताचा सतत सहवास जर कशाने लाभत असेल तर त्याच्या नामानेच. या नामाच्या सहवासात राहिल्याने देहावरचे प्रेम आपोआप नष्ट होईल, आणि मग देहाने मांडलेल्या प्रपंचावरचेही प्रेम कमी होईल. पुढे त्याला सर्वत्र परमेश्वरच दिसेल. तेव्हा आत्तापासून, मी राहीन तर नामातच राहीन असा निश्चय करा. मला खात्री आहे राम तुमच्यावर कृपा करील.



आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
सोमवार, ६ नोव्हेंबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# आता पुरंदरच्या जयाद्री खोऱ्यातून पुन्हा धावू लागली सह्याद्री एक्स्प्रेस

आधुनिक केसरी न्यूज

**पुरंदर :** कोव्हिडच्या संकट काळात अनेक रेल्वे मार्गांवरून धावणाऱ्या रेल्वे गाड्या बंद ठेवण्यात आल्या होत्या टप्प्याटप्प्याने सर्व रेल्वे गाड्या पुन्हा सुरू करण्यात आल्या. त्यानंतर गेली दोन वर्षांत सह्याद्री एक्स्प्रेस बंद होती. वेळोवेळी रेल्वे प्रशसनाला पत्रव्यव्हार करुनही प्रतिसाद मिळत नव्हता. नुकतेच पुणे विभागीय रेल्वे बोर्डाच्या बैठकीत सह्याद्री एक्स्प्रेस बाबत निर्णय घेण्यात आला असून 5नोव्हेंबर पासून सहयाद्री पुन्हा जयाद्री खोऱ्यातून धावू लागली आहें

कोल्हापूर ते मुंबई दरम्यान रात्री धावणारी सह्याद्री एक्स्प्रेस मुंबईत सकाळी अकराच्या सुमारास पोचत असे. सायंकाळी सहा वाजता पुन्हा कोल्हापूरकडे रवाना होत असे. ही गाडी मुंबईकडे जाण्यासाठी जेजुरी नीरा शहरात पहाटे साडेचार साडेपाच दरम्यान येत असे आणि मुंबईहून रात्री बाराच्या सुमारास येते होती. यामुळे जेजुरी शहरासह नीरा पुरंदर, बारामती, फलटण, खंडाळा तालुक्यातील शंभर गावातील व्यावसायिक, नोकरदार यांना मुंबईला जाऊन यायला सोईची होती. दिवसभराचे काम करुन पुन्हा नीरेत येता येत होते. पण गेली दोन वर्षांपासून ही गाडी बंद राहिल्याने प्रवाशांची गैरसोय झाली होती. आता पुन्हा सह्याद्री एक्स्प्रेस (गाडी क्र. १०२३/१०२४) नव्या वेळेत सुरु केली आहे, पण ती कोल्हापूर - पुणे दरम्यान धावणार असल्याने प्रवाशांनी काहीसे समाधान व्यक्त केले आहे. ०५ नोव्हेंबर पासून सह्याद्री एक्स्प्रेस कोल्हापूर येथून रात्री ११:३० वाजता मुंबईकडे रवाना होणार आहे. मिरज ००:३५, कराड ०२:०७, सातारा ०३:५७, नीरा ०५:१३, जेजुरी ०५:४८, पुणे ०७:४५ येथे पोहोचेल. पुणे येथुन रात्री रात्री ०९:४५ वाजता कोल्हापूरकडे रवाना होणार आहे. जेजुरी येथे १०:४४, नीरा येथे ११:१४, सातारा ००:२२, कराड ०१:३५, कोल्हापूर येथे ०५:४० वाजता पोहोचेल.



# एकनाथ खडसेंना हृदयविकाराचा झटका

## मुख्यमंत्र्यांकडून एअर ॲम्बुलन्सची व्यवस्था

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** राष्ट्रवादीचे नेते एकनाथ खडसे यांना हृदयविकाराचा झटका आला आहे. त्यामुळे त्यांना तातडीने मुंबईत उपचारासाठी आणण्यात येणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खडसे यांना मुंबईत आणण्यासाठी एअर ॲम्ब्युलन्सची व्यवस्था करण्यास सांगितले आहे. नाथाभाऊंवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी मीडियाशी संवाद साधताना खडसे यांच्या आरोग्याची माहिती दिली आहे. गेल्या दोन दिवसांपासून नाथाभाऊंच्या छातीत दुखत होते. आज त्रास वाढल्याने त्यांना रुग्णालयात आणण्यात आल्याचे डॉक्टरांनी म्हटले आहे. मात्र, खडसे यांची प्रकृती स्थिर असल्याचंही त्यांनी स्पष्ट केले आहे.

एकनाथ खडसे यांच्यावर जळगावच्या गजानन हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. सकाळी त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आता त्यांची प्रकृती स्थिर आहे. याबाबत डॉ. विवेक चौधरी यांनी मीडियाशी संवाद साधला आणि खडसे यांच्या प्रकृतीची माहिती दिली. दोन दिवसापासून एकनाथ खडसे यांच्या छातीत बर्निंग सेंच्युरीनचा त्रास होता. ते रुटीन चेकअपसाठी आले. त्यांचा रक्तदाब स्थिर आहे. रक्तातील साखरही स्तिर आहे. छातीत थोडं कंजेशन आहे. त्यामुळे त्यांच्यावर पुढील उपचार करण्याची गरज आहे. ॲन्जिओग्राफी वगैरे करावी लागणार आहे. चेस्ट इन्फेक्शनची ट्रीटमेंट लागू शकते. त्यांच्यावर प्राथमिक उपचार झाले आहेत. त्यामुळे त्यांना पुढच्या उपचारासाठी मुंबईला नेण्यात येणार आहे, अशी माहिती डॉ. विवेक चौधरी यांनी दिली. एकनाथ खडसे यांना बॉम्बे हॉस्पिटलला दाखल करण्यात येणार आहे. तिथे त्यांच्यावर उपचार सुरू होते. त्यांना कोणताच त्रास नाहीये. चेस्टपेन नाहीये. चेस्ट इन्फेक्शन असू शकतं. त्यासाठी ते शिफ्ट होतील. खडसे यांना मुंबईला नेण्यासाठी एअर ॲम्ब्युलन्सने नेण्यात येणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली. खडसे यांच्यावर प्राथमिक उपचार झाल्यानंतर त्यांनी आमच्याशी गप्पा मारल्या. पण खबरदारीचा उपाय म्हणून त्यांना मुंबईला नेण्यात येत असल्याचं डॉ. चौधरी यांनी सांगितले.

# राज्य सरकार राज्याला ड्रग्सच्या विळख्यात आणण्याचे काम करीत आहे : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** गुजरातचे ड्रग महाराष्ट्रात आणण्याचे काम शिंदे सरकारने केले आहे. राज्य सरकार राज्याला ड्रग्सच्या विळख्यात आणण्याचे काम करीत आहे. ललित पाटीलच्या माध्यमातून यापूर्वी पुढे आले आहे. मुंद्रा पोर्टवरून महाराष्ट्रात ड्रग्स येत असून यात राज्य सरकारचे त्यावर नियंत्रण नसल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला. नाना पटोले प्रसार माध्यमांशी नागपुरात बोलत होते. महाराष्ट्रात ड्रग गुजरातमधून येत असताना सरकारचे त्यावर नियंत्रण नाही. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ड्रगचे समूळ नष्ट करू असे जाहीर केले असले तरी गुजरातवरून ड्रगचा पुरवठा कसा होतो याची चौकशी केली पाहिजे, असेही पटोले म्हणाले. मराठवाड्यात कुणबी मोठ्या प्रमाणात आहेत मात्र त्यांना फायदे मिळत नाहीत. शिंदे समितीला नोंदी आढळल्या असून त्यात मराठा हा शब्द आढळतो, जनगणना महत्त्वाची गोष्ट आहे, केंद्र सरकारने जनगणना थांबवून ठेवली आहे, ५० टक्क्यांची मर्यादा काढल्याशिवाय आरक्षण देण्यात अडचण येईल, असेही पटोले म्हणाले. अजित पवार यांच्या आईला मुलगा मुख्यमंत्री व्हावा असे वाटत असते. त्यात काहीच चूक नाही. मात्र महायुतीमध्ये अजित पवार यांना संधी मिळेल, असे वाटत नाही, असेही पटोले म्हणाले. छत्तीसगढमध्ये भाजपाने जाहीरनामा काढला. गॅस सिलिंडर ५०० रुपयांत देण्याचे सांगितले, पंतप्रधान हे देशाचे आहेत मग देशभरातील जनतेला द्यायला पाहिजे. धानाला आधारभूत किंमत वाढवण्याचे सांगतात, राज्याचे मुख्यमंत्री नसून देशाचे पंतप्रधान सांगत आहेत, असेही पटोले म्हणाले. महागाई कितीही केली तरी लपवता येत नाही. भाजपा प्रदेशाध्यक्ष राज्यात फिरत आहेत तेव्हा याचा अनुभव त्यांनाही आला आहे.






## चंद्रचूड यांची स्पष्टोक्ती

आधुनिक केसरी

महाराष्ट्रातील सत्तासंघर्षावर गेल्या दीड वर्षांत अनेकदा राज्यातील सत्ताधारी व विरोधक सर्वोच्च न्यायालयात गेल्याचं पाहायला मिळालं आहे. आधी शिवसेना व आता राष्ट्रवादी काँग्रेसमधील दोन्ही गटांनी एकमेकांच्या आमदारांविरोधात अपात्रतेची नोटीस बजावली असून त्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात सविस्तर सुनावणीही पार पडली. त्याचबरोबर पक्षनाव प पक्षचिन्ह यासंदर्भातही न्यायालयात सुनावणी झाली. आमदार अपात्रतेचा निर्णय न्यायालयाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यावर सोपवला. मात्र, त्यांनी निर्णय घेण्यात दिरंगाई केल्यानंतर अखेर न्यायालयाने राहुल नार्वेकरांना परखड शब्दांत सुनावत ३१ डिसेंबरपर्यंत शिवसेना तर ३१ जानेवारीपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेसबाबत निर्णय घ्यायचे आदेश दिले. या सर्व घडामोडींमुळे गेल्या काही दिवसांपासून सर्वोच्च न्यायालय व संसद किंवा विधानसभा, अर्थात न्यायपालिका व कायदेमंडळ यांच्यातील अधिकारांच्या विभागणीची मोठी चर्चा पाहायला मिळत आहे. सर्वोच्च न्यायालय कोणत्या विषयांवर सरकारला निर्देश देऊ शकते, कोणत्या विषयात कायदेमंडळाचे सार्वभौमत्व अबाधित आहे अशा अनेक मुद्द्यांची चर्चा होत आहे. याच मुद्द्याला धरून देशाचे सरन्यायाधीश व ज्यांच्यासमोर यातल्या अनेक महत्त्वाच्या प्रकरणांची सुनावणी चालू आहे, ते न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनी हिंदुस्तान टाईम्स लीडरशिप समिट २०२३मध्ये बोलताना आपली नेमकी भूमिका स्पष्ट केली. या कार्यक्रमात बोलताना सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी कायदेमंडळ न्यायपालिकेकडून आलेला निर्णय नाकारू शकत नाही, असे स्पष्ट केले आहे. फक्त अमुक निर्णय चुकीचा आहे, असे वाटले म्हणून कायदेमंडळ न्यायपालिकेकडून आलेले निर्णय नाकारू शकत नाही. पण जर न्यायालयांनी एखाद्या कायद्याचा अमुक एक प्रकारे अर्थ लावला आणि कायदेमंडळाला त्यात काही चूक वाटली तर संसदेला त्या कायद्यातील त्रुटी दूर करण्याचा पूर्ण अधिकार आहे. कायदे अधिकाधिक समृद्ध करण्याची मुभा नक्कीच आहे. पण तुम्ही न्यायालयांनी दिलेले निर्णय थेट नाकारू शकत नाही, असं चंद्रचूड म्हणाले. न्यायाधीश थेट लोकांमधून निवडून येत नसल्यामुळे ते जनतेला उत्तरदायी नसतात, असं सरन्यायाधीश म्हणाले आहेत. आमची जनतेकडून निवड होत नाही. जनतेतून निवड होणारे लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय यंत्रणा महत्त्वाची असते. ते जनतेला थेट उत्तरदायी असतात. ते संसदेला उत्तरदायी असतात. मी सरन्यायाधीश म्हणून या व्यवस्थेचा आदरच करतो.

## महिलांनी उद्धारकर्ते समजून घ्यावे..



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**बोलण्याचा अधिकार मिळाला म्हणून काहीही बोलू नये. भारत जातीप्रधान देश आहे हे अनेक वेळेस सिद्ध झाले आहे. देशातील विषमता, द्वेष संपला असे म्हणून केवळ स्वतः चे समाधान करून घेतल्या सारखे होय. आजही देशामध्ये विषमता, जातीय द्वेष एवढ्या मोठ्या प्रमाणावर आहे की जातीची घाण डोक्यात असलेले लोक द्वेषाची भाषा करून सामाजिक तेढ निर्माण करताना दिसतात. रिल्सला रिअल समजून आणि भडकावू व द्वेषात्मक बोलण्याला विद्वता समजणारे गुणहीन लोकांची आजही कमी नाही. देशात शाळेय पुस्तकी शिक्षण घेणाऱ्यांची संख्या जरी वाढली असेल तरी बौद्धिक विकास झालेले, गुणांची कदर करून जाती धर्मापेक्षाही देशाला महत्त्व देणारे, आणि माणसिक गुलामी झुगारून वैचारीक पातळी परिपक्व असणारे, अंधविश्वास, थोतांड, पाखंड सोडून विज्ञानवादाची दृष्टिकोन बाळगणारे लोक मात्र अजूनही कमीच आहेत.**

मानसिक गुलामीला कारणीभूत घटक आणि मानसिक गुलामीतून मुक्त होण्याचे उपाय जोपर्यंत लोकांना कळणार नाही तो पर्यंत देशात विषमता, द्वेष टिकुणच राहील. माणसिक गुलाम असलेल्या डोक्यांचा वापर सामाजिक तेढ निर्माण करण्यासाठी मालक बरोबर करत असतात. माणसिक गुलामांना सत्य, फायदा तोटा याबद्दल काहीही घेण देण नसते. तर मालकाने सांगितले ते काम अंतिम सत्य समजून गुलाम काम करत असतात. माणसिक गुलामी मुळेच तर अनेक लोकांना कर्तृत्व वान गणवान लोकांच्या कार्याची व विचाराची जाणीव झाली नाही. उलट माणसिक गुलाम लोक ज्या संत महापुरुषांनी अखिल माणवते साठी, समतेसाठी काम केले अशा संत महापुरुषांचे नावही घेत नाहीत. ज्यांना शिक्षण घेऊन भारतीय संविधान व मानवतावादी महापुरुष कळाले नाही त्यांना सुशिक्षित कसे म्हणायचे? हा खूप मोठा प्रश्न आहे. भारतीय संविधान व महापुरुषांचे कार्य समजून घ्यायचे असेल तर अगोदर आपल्या सामाजिक व्यवस्था समजून घेणे आवश्यक आहे. जाती जाती मध्ये माणसाला विभागुन, माणसाचे शिक्षण, हक्क अधिकार नाकारून, लोकांना अज्ञानी ठेवून त्यांच्या मध्ये अंधविश्वास व पाखंड पेरून कोणी फायदा करून घेतला याचे उत्तर जोपर्यंत सापडणार नाही. किंवा हि परिस्थिती जोपर्यंत मान्य होणार नाही तोपर्यंत लोक माणसिक गुलामच राहणार. हक्क अधिकार स्वातंत्र्य नाकारून मानसिक गुलाम असलेल्या लोकांना फुले शाहु आंबेडकर यांनी माणसाला माणूस बनवले व विकासाचे सर्व साधने उपलब्ध करून दिले. महिलांना तर चौकट ओलांडण्याचा, माणसासोबत बसण्याचा, माणसा अगोदर जेवण्याचा, घरात सल्ला देण्याचा, घरातील निर्णयात सहभाग होण्याचा ही अधिकार नव्हता शिक्षण, नोकरी आणि स्वातंत्र्य तर खुप दुरची गोष्ट आहे. परंतु महात्मा फुले व सावित्रीमाई यांनी महिला शिक्षणाला विरोध असून महिलांना शिकवले, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण, नोकरी मध्ये आरक्षण देऊन संरक्षण केलेच पण सोबत स्वातंत्र्य व हक्क अधिकार ही बहाल केले. त्यातील एक अधिकार म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार जो संविधानाने कलम १९ नुसार दिला. महिलांना व पुरुषांना बोलण्याचा, आपले व्यक्त करण्याचा अधिकार नव्हता म्हणून संविधानामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी तो अधिकार अंतर्भूत करून ज्यांना व्यक्त होण्याचा अधिकार नव्हता त्यांना तो अधिकार दिला. म्हणून आज आपण सोशल मिडिया, इलेक्ट्रॉनिक मिडिया, प्रिंट मिडिया, सभा, आंदोलन, मोर्चा यांच्या माध्यमातून व्यक्त होत असतो. याच अधिकारामुळे महिला बोलायला लागल्या आणि अधिकार मिळाल्यावर महिला काय बोलतात आम्हाला आरक्षण नाही तर कोणालाच आरक्षण नको. असं जेव्हा



महिला बोलते तेव्हा तिच्या बुद्धीची कीव येते कारण त्या महिलेला अजून आरक्षण कळाले नाही, आरक्षणाचे लाभार्थी कळाले नाही म्हणून मनात येईल ते बोलुन आपले अज्ञान उजागर करत आहे. अशा महिलांनी एक गोष्ट लक्षात घ्यावी तु जे शिक्षण घेतले ना तेही बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या आरक्षणामुळेच. कलम १६ नुसार सार्वजनिक क्षेत्रामध्ये समान संधी निर्माण करून जेथे महिलांना महिला म्हणून डावलले जात होते, किंबहूना महिलांना घराच्या बाहेरच येऊ दिले जात नव्हते ते सर्व कलम १६ ने मोडीत काढले व महिलांचा विचार केला. याला महिला आरक्षण म्हणता येत नाही का? कारण आरक्षण केवळ सामाजिक संधी निर्माण करून देते. तिच संधी कलम १५ व कलम १६ ने निर्माण करून दिली. कलम क्रमांक ४१ नुसार शिक्षणासाठी साह्य करण्याची तरतूद करून संविधानाच्या माध्यमातून बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना महिलांना सुरक्षित केले म्हणून महीलांचा शिक्षणा मधील वाटा वाढला. यावर महिला कधीच बोलत नाही. का सत्य बोलायची आजही हिंमत होत नाही? की आजही आपले मन एवढे बेईमान आहे की जगाने विद्वान माननेल्या महामानवाची विद्वता आपण केवळ जातीमुळे माणत नाही. ज्या महामानवला जगाने विद्वान मानले आणि त्या विद्वाना बद्दल आपुलकी नसेल, त्यांच्या ज्ञानाची जाणीव नसेल तर घेतलेल्या शिक्षणाचा फायदा आहे तरी कोणाला? मग हे महिलांचे हक्क काढुन घेतले तर चालतील का? रिल्स बनवून हिरो होण्याच्या नादात वैचारिक दृष्ट्या व नैतिक दृष्ट्या झिरो होत आहेत याची तरी जाणीव आहे का? आरक्षणाला व संविधानाला एकाच समूहाची खाजगी संपती समजणारे लोक कोणत्या आधारावर गुणवंत होणार आहेत? मराठा समाजातील बहुसंख्य लोकांकडे कुणबीचे प्रमाणपत्र असल्याने ते सुरवाती पासून आरक्षणाचा फायदा घेत आहेत. त्यांचे ही आरक्षण काढुन घ्यायचे का? कुठुन तरी काल्पनिक पोस्ट तयार करून ४०% टक्के वाला नोकरी करतो व ९०% वाला शेती करतो असते रिल्सच्या माध्यमातून सांगत आहेत. मग जे मराठा लोक अगोदरच अगोदर पासुनच आरक्षणाचा फायदा घेत आहेत तेही ४०% वालेच आहेत का? बोलण्याचा अधिकार दिला म्हणून काही पण बडबड करून स्वतः ची विद्वता सिद्ध होत नाही उलट स्वतः चे अज्ञान व गावंढळ पणा समोर येतो. दोन रूपये तिन तिन रूपये किलोचे उदाहरण देऊन स्वतः च्याच समाजातील लोकांच्या गरीबीची खिल्ली उडवली जाते. गरीबी ची खिल्ली उडवणारे लोक विद्वान असतात का? दोन रुपये आणि तिन रुपये किलोचे अन्न तुम्ही ज्या जातीला उद्देशून बोलता ना त्यांनाच नाही तर सर्व गरीबांना मिळते. एकिकडे म्हणायचे आम्ही गरिब आहोत दुसरी कडे गरीबीची खिल्ली उडवून स्वतः च्या अज्ञानाचे प्रदर्शन करायचे आणि म्हणायचे ९०%वाला घरी आहे हे कितपत योग्य आहे? आरक्षणावरुन चुकीचे बोलुन सामाजिक तेढ निर्माण करणारे अज्ञानी तरुण तरुणींनी एकदा तरी मुलींच्या शिक्षणाची सुरवात झालेल्या भिडे वाड्या बद्दल बोलावे. भिडे वाडा येथून मुलींचे शिक्षण सुरू झाले शिक्षणातून नोकरी, नोकरी तुन पैसा आणि पैशातून सौंदर्य प्रसादने, महागड्या साड्या घालून सुंदर दिसणाऱ्या महिला वाढल्या. परंतु महिलांच्या अंगावर हे सौंदर्य ज्या भिडे वाड्याने वाढवले तो भिडे वाडा जिर्ण झाला, मोडकळीस आला. आरक्षणाच्या आडून द्वेष पसरवणाऱ्या तरुणी भिडे वाड्याच्या संवर्धनासाठी, राष्ट्रीय स्मारकासाठी कधीच बोलताना दिसल्या नाही. हीच विद्वता व हाच प्रामाणिक पणा आहे का? सावित्रीमाई मुले शिकलेल्या तरूणींनी सावित्रीमाई वाचल्या नाही. महिलांच्या हक्क अधिकारासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मंत्रीपदाचा त्याग केला, ते हिंदुकोडबिल कधी महिलांनी वाचले नाही. महिलांवर जर सर्वात जास्त उपकार कोणाचे असतील तर ते आहेत सावित्रीमाई व जोतीराव फुले आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर. जर महिलांना फुले दाम्पत्य आणि बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर कळाले नसेल तर ते शिक्षण आणि विद्वता शुन्य आहे. कारण जो पर्यंत महिलांना महिलांचे उद्धारकर्ते कळत नसतील तर महिलांवर अन्याय अत्याचार व गुलाम कोणी बनवले हे कळणार नाही. आणि महिलांना स्वतः च्या माणसिक गुलामींचा आणि स्वातंत्र्याचा इतिहास माहिती नसेल तर ते शिक्षण कुचकामी व दर्जाहीन असते. म्हणून अगोदर बौद्धिक व वैचारिक दर्जा वाढवला पाहिजे आणि नंतर पुराव्यानिशी व्यक्त व्हायला पाहिजे याला गुणवत्ता म्हणतात. बोलण्याचा अधिकार मिळाला म्हणून काहीही बोलुन स्वतः चे अज्ञान स्वतः च दाखवू नये.

## भावनिकतेचा चक्रव्यूह भेदण्यासाठी ज्ञान हेच ब्रह्मास्त्र



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**जीवन म्हटलं की भावनेचा समुद्र आलाचा हा समुद्र तरूण जाण्यासाठी ज्ञान रूपी नौका कामी येते. ज्यांच्या जवळ योग्य ज्ञान आहे तो हा समुद्र सहज तरूण जातो आणि अज्ञानी जीव मात्र या समुद्रात अडकतो.जीवनाच्या वाटेवर मार्गक्रमण करत असताना पदोपदी पावलोपावली आपल्याला योग्य मार्गावर ठेवण्याचं काम आपली ज्ञान बुद्धी करत असते. परंतु याच दरम्यान जीवनात अनेक भावनिक घडामोडी घडत देखिल असतात भावनिक घडामोडी आणि जीवन ह्या एका नाण्याच्या दोन बाजू असतात.त्या मुळे याचा प्रत्यक्ष अ प्रत्यक्ष परिणाम हा आपल्या जीवनावर होत असतोच.भावनिक घटना घडामोडी ह्या जीवनातील वेगवेगळ्या टप्प्यांवर ह्या वेगवेगळ्या विषयांशी निगडित संबंधित असतात.त्याच बरोबर वेळेनुसार या भावनिक घटनांचा गांभिर्य हे देखिल वेगवेगळ असत.**

आणि मग या घटनांचा घडामोडी चा आपल्या बुद्धीवर प्रभाव निर्माण होऊन जीवनात प्रचंड मोठ वादळं निर्माण होत असत. या वादळाच्या तडाख्यात प्रत्येक जीव चुकुन हुकुन आडकतोच हे वास्तव आहे पण या मधून आपली सही सलामत सुटका करून घेण्यासाठी अथवा भावनिक चक्रव्युहातुन बाहेर पडण्यासाठी आपली ज्ञानबुद्धी हिच सदैव सकारात्मक ज्ञानावर स्थिर जागृत असली पाहिजे. भावनिकतेला फार कुरवाळत न बसता वास्तविक सत्य जाणून घेऊन पुढे मार्गक्रमण करण गरजेच असत. जीवनाच्या प्रवासात आपण नेहमी वारंवार भरकटले जातो ते म्हणजे भावनिकतेमुळे खर पाहिलं तर आपली बुद्धी ही सत्याची पारखी असते.जोपर्यंत आपण ज्ञानावर असतो तो पर्यंतच आपण सत्य स्वीकारून मार्गक्रमण करतो. एकदा का आपलं ज्ञान विचलित झाल किंवा आपण ज्ञान मार्गावरून बाजूला झालो कि मग मात्र अज्ञानावर स्वार होतो. आणि अज्ञानाच्या साम्राज्यात भवनिकता आपलं राज्य विस्तार करते.त्याचा परिणाम जीवन अस्थिर होऊन मग आपलं कहि खरं राहत नाही. म्हणजेच आपलं आपल्यावर पुर्ण नियंत्रण राहत नाही. याच काळात आपण कधी फसलो गेलो हे सुद्धा आपल्याला लक्षात येत नाही.शेवटी भावनेच्या आहारी जाऊन सगळं वाटोळं झाल्यानंतर लक्षात येऊन तरी उपयोग काय आहे.आणि महणुन आपण सदैव सजग राहून भावनिकतेचे शिकार होणार नाहीत.याची दक्षता घेतली पाहिजे.यासाठी आपली योग्य समज उमज ज्ञान कामी येत.सत्य समोर असताना ते न दिसण किंवा सत्य पाहण्याची भावना न होणं अथवा खोट्या मृगजळात एवढं खोलवर पोहचण कि सत्य दुर दुर पर्यंत न दिसण .वास्तविक भवनिकता म्हणजे सत्यापासून दुर जाण आणि जेव्हा आपण सत्यापासून दुर जातो तेव्हा आपण शक्यतो भरकटतो . आपल ज्ञान कमी पडल कि आपण भावनिक नदीच्या पुरात वाहून जातो. आपल्याला भावनिकते च्या पुरातुन आपला बचाव करायचा असेल तर आपलं ज्ञान हेच प्रभावी असलं पाहिजे. म्हणजेच आपलं ज्ञान बुद्धी आपल्याला भावनिक चक्रव्यूहातून बाहेर पडण्यासाठी प्रभावी ठरू शकते. सत्या पासून आपल्याला दुर घेउन जाणार या सगळ्या बाबी विषय म्हणजे भावनिकता.आपला मुख्य घोळ इथंच होतो कि आपली निवड चुकते .आणि आपण मृगजळ समजून धावतो आपण कोणाच्या पाठिमागे का धावतोय हे देखिल आपल्याला कळत नाही. ज्या पद्धतीने काही तरी कोणाला तरी समजून आपण धावतो ते भावनिक होऊन शिकार होण्यासाठी पुरेस ठरत. शेवटी परिणाम आल्यावर पश्चात्ताप करण्याची वेळ आपल्यावर येते. हे निसर्ग चक्र आहे म्हणून वेळीच सावध झाल पाहिजे. भावनिकतेऐवजी बुद्धी वापरून आपल्या स्वतःच रक्षण करण हे आपल्या स्वतःच कर्तव्य जबाबदारी आहे. भावनिकत हे सगळ्यात उत्कृष्ट आणि स्वस्त भांडवल असत म्हणून कोणीही आपला वापर करणार नाही एवढं भक्कम ज्ञान हे आपल्या कडे असलं पाहिजे. भावनिकतेच मृगजळ आणि हा खेळ अनादी काळापासून निरंतर चालत आलेला आहे.जो या भावनिक खेळात फसला तो संपला त्यांच्यावर पश्चात्ताप करण्याची वेळ येते. या खेळातील लाभार्थी म्हणून आपला कोणीही वापर करणार नाही एवढं सज्जग आपण स्वतः असलं पाहिजे. पश्चात्ताप करून काही उपयोग नसल्याने आपण या खेळात अडकणार नाहीत हेच महत्वाचे आहे.संबध जग आणि जीवन हे भावनिक तेच्या परिघात फिरत असतं.आपण कुठे अडकतो हे कधी कधी आपल्याला देखिल कळतं नाही.म्हणून जगाचं निरीक्षण करताना भावनिक नाही तर जागृत असलं पाहिजे.ज्ञान बुद्धी चा वापर करून दुसरी बाजू आपल्याला समजून आली पाहिजे. अथवा वास्तव सत्य जाणता आलं पाहिजे. बाब अथवा विषय या मधील वास्तव आपल्याला समजलं तर आपण अशा मृगजळात अडकण्यापासुन आपसुकच सुटतो.योग्य वेळी योग्य समज असली तर कोणीही स्वतःच्या व्यक्तिगत स्वार्थासाठी आपला उपयोग करून घेऊ शकत नाही.पण हे सगळं अगोदर समजलं पाहिजे. पण असं होतं नाही आपल्याला कोणी गोड बोललं अथवा मोठेपणा दिला कि आपण बुद्धी वापरत नाही भावनिक होतो आणि मग शिकारी आपली शिकार बरोबर करतो. याला जबाबदार आपणच असतो. आपण स्वतः आपली या चक्रव्यूहातुन सोडवणुक करून घेऊ शकतो.त्यासाठी आपण भावनिक न होता आपलं ज्ञान वापरलं पाहिजे.आपलं ज्ञान हेच आपल्या बचावाच प्रभावी माध्यम आहे.आणि जीवन हितार्थ हे ब्रह्म अस्त्र आपण वापरल तर आपलं हित झाल्याशिवाय राहणार नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# बल्हारशाह-वर्धा ट्रेनच्या वेळेत बदल केल्याबद्दल पदाधिकाऱ्यांद्वारे हंसराज अहीर यांचे अभिनंदन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्ह्यातील प्रवासी, नोकरदार व रेल सुविधा संघर्ष समितीच्या पदाधिकायांच्या मागणीची दखल घेवून राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहीर यांनी अखेर ट्रेन क्र. 01316 बल्हारशाह-वर्धा या विशेष डेमू ट्रेनच्या वेळापत्रकामध्ये बदल करवून घेत जिल्ह्यातील प्रवाशांना दिलासा दिला आहे.
सदर ट्रेन ही यापूर्वी बल्हारशाह स्थानकातून सायंकाळी 05.00 वा सोडण्यात येत होती. त्यामुळे जिल्ह्यातील रेल्वे प्रवासी विशेषतः शासकीय कर्मचाऱ्यांसाठी ही ट्रेन असुविधाकारक ठरत असल्याने झेडआरयुसीसी चे सदस्य दामोदर मंत्री व रेल्वे सुविधा संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी हंसराज अहीर यांची भेट घेवून त्यांचेकडे ही अडचण व्यक्त केली होती. या अडचणीची दखल घेवून अहीर यांनी या डेमू ट्रेनची वेळ बदलण्याकरीता केंद्रीय रेल्वेमंत्री, रेल्वे बोर्ड चेअरमन यांचेशी पत्रव्यवहार व प्रत्यक्ष चर्चा करुन या ट्रेनची वेळ बदलवून बल्हारशाह-वर्धा प्रवास करणाऱ्या प्रवाशांना सुविधा उपलब्ध केली आहे. आता ही डेमू ट्रेन बल्हारशाह वरुन सायंकाळी 06.30 वा. सुटून चंद्रपूर येथे 06.53 वा. पोहचेल व ही ट्रेन वर्धेला रात्रो 09.30 वा. पोहचणार आहे. या बदलामुळे नोकरपेशा लोकांना चांगली सुविधा झाली असून त्यांना कार्यालयाची वेळ सांभाळून यामुळे सोयीचा प्रवास करण्याची संधी मिळाली आहे. डेमू ट्रेनच्या वेळापत्रकात बदल करवून घेत जिल्ह्यातील प्रवाशांना सुविधा उपलब्ध केल्याबद्दल रेलसुविधा संघर्ष समितीचे पदाधिकारी सर्वश्री रमणीकभाई चव्हाण, दामोदर मंत्री, नरेंद्र सोनी, शाम सारडा, डॉ भूपेश भलमे, पूनम तिवारी, प्रदिप माहेश्वरी, अनिश दिक्षित, अशोक रोहरा, राजेश सादरानी, नरेश लेखवानी, संजय मंघानी, प्रमोद त्रिवेदी, सुदाम यादव, महावीर मंत्री, रमेश बोथरा, शकरसिंह राजपूरोहीत, प्रभाकर मंत्री, प्रल्हाद शर्मा, विनोद बजाज, मिलिंद दाभेरे, गौतम यादव यांनी हंसराज अहीर यांची भेट घेवून अभिनंदन केले. जिल्ह्यातील अन्य महत्वपूर्ण रेल्वे विषयक समस्या व आवश्यक असलेल्या ट्रेन सुरु करण्यास पुढाकार घ्यावा अशी मागणी केली. सदर पदाधिकाऱ्यांशी चर्चा करतांना हंसराज अहीर यांनी मुंबई करीता थेट गाडी सुरु करण्यास तसेच अन्य रेल्चे विषयक प्रश्नांबाबत आपण प्रयत्न करु असे आश्वासन दिले. यासंदर्भात रेल्वे मंत्री व चेअरमन यांचेसोबत लवकरच बैठक घेत असल्याची माहिती त्यांनी रेल्वे समितीच्या पदधिकाऱ्यांना दिली.

# सोयगाव तालुक्यात ऐन दिवाळी, भाऊबीजेला बसची भाडेवाढ

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात ऐन दिवाळीत यंदा दहा टक्के भाडे वाढ करण्यात आली आहे.दिवाळी सुट्टीत एसटीने प्रवास करण्याचे नियोजन करणाऱ्या प्रवाशांना आता अधिक खिसा रिकामा करावा लागणार असल्याची माहिती सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी दिली. एसटी महामंडळाने सर्व प्रकाराच्या एसटी गाड्यांमध्ये सरसकट १० टक्के भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. ८ नोव्हेंबरपासून ही दरवाढ लागू होणार आहे. आरक्षण केलेल्या प्रवाशांनाही भाडेवाढीची झळ सहन करावी लागणार आहे.

दिवाळीतील धनत्रयोदशी, लक्ष्मीपूजन, पाडवा आणि भाऊबीज असे सण नातेवाईकांसह साजरे करण्याची प्रथा ग्रामीण भागात जास्त आहे. दिवाळीतशाळा-महाविद्यालयांनाही मोठी सुट्टी असल्याने सहकुटुंब गावी जाण्यासाठी गर्दी असते. यामुळे रेल्वे, खासगी गाड्यांसह एसटीही प्रवाशांनी भरून धावत असतात.यंदा ७ नोव्हेंबरच्या मध्यरात्रीपासून अर्थात ८ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबरदरम्यान एसटीच्या सर्व बसश्रेणीमध्ये १०३ भाडे वाढ लागू करण्यात येणार आहे. २८ नोव्हेंबरनंतर मुळ दराने तिकीट आकारणी सुरू होणार आहे. आरक्षित तिकीटाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना वाढीव भाडेदरातील फरकाचे पैसे प्रवास करताना द्यावे लागणार आहेत, अशी माहिती माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी दिली आहे.

एसटी ताफ्यातील १४ हजार बस प्रवासी सेवेत धावत आहेत. शिवनेरी, ई- शिवनेरी, शिवाई, अश्वमेध, परिवर्तन (लालपरी), हिरकणी, शितल,विना वातानुकूलित आसनी व शयनयान अशा सर्व बसश्रेणींसाठी भाडेवाढीनुसार तिकीट आकारण्यात येणार आहे. महसूल वाढीसाठी महामंडळाकडून अनेक उपाय राबवण्यात येत आहेत. दरवर्षी दिवाळी हंगामात १० टक्के हंगामी भाडेवाढ लागू केली जाते. मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ सुरू असलेल्या आंदोलनामुळे बंद आगारातील वाहतूक शुक्रवारी पूर्ववत झाली आहे. यामुळे दिवाळीतील उत्सव वाहतूक निर्विघ्न आणि सुरळितपणे पार पडेल, असा विश्वास सोयगाव आगार प्रमुख विजय काळवणे यांच्याकडून व्यक्त करण्यात आला आहे.

# खुलताबाद तालुक्यातील सर्व उपोषणधारकांची माघार

## साखळी उपोषण, कँडल मार्च स्थगित

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण साठी सुरु असलेले आमरण उपोषण राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने वेळ मागत (दि.२४) पर्यंत मराठा आरक्षण साठी राज्यभर मराठा कुणबी नोंदणी तथा पुरावे एकत्रीत करुन आरक्षण देण्याचा 'शब्द' दिला व उपोषण मागे घ्या. यात सरकारला यश मिळाल्याने पाटील यांनी आमरण उपोषण मागे घेतले त्यामुळे तालुक्यात ठिकठिकाणी सुरु असलेले सखळी उपोषण आमरण उपोषण ,रस्ता रोको,स्कॅंडल मार्च स्थगती देण्यात आली आहे. अंतरवाली सराटी अंबड जालना येथे सुरु असलेल्या मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील व त्यांना पाठिंबा देणारे ग्रामस्थ महिला मुले यांच्यावर लाठीमार झाल्यानंतर ठिकठिकाणी भडका उडून मराठा आरक्षण ला गती मिळाली.व त्याचे वाढतच गेले प्रथमता राज्य सरकारने चाळीस दिवसांचे वेळ मागितला.उपोषण थांबले या दरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी सकल मराठा जनजागृती म्हणून खुलताबाद तालुक्यांचा दौरा केला येथे त्यांना प्रचंड प्रतिसाद मिळाला व जनजागृती नंतर पाटील यांनी सराटी अंबड जालना येथे वैश्विक असी गर्दीची अराजकीय सभा घेतली. येथून मात्र प्रचंड प्रतिसाद मिळाला तदनंतरही मात्र आरक्षण न मिळाल्याने पाटील यांनी पुन्हा आमरण उपोषण सुरु केले.यादरम्यान मराठवाडाभर प्रचंड प्रतिसाद मिळत गेला. मग जरांगे यांना पाठींबा म्हणून खुलताबाद शहर सह तालुक्यांतील सकल मराठा समाज एकवटला व त्यांनी खुलताबाद शहर,वेरुळ,गल्ले बोरगाव,काटशिवरी फाटा,बाजार सावंगी, सुलतानपूर,ताजनापूर सह ठिकठिकाणी सकल मराठा समाजाने आमरण उपोषण साकळी उपोषण लाक्षणिक उपोषण रस्ता रोको आंदोलन स्कॅंडल मार्च रस्ता रोको आदि लोकशाही मार्गाने व शांततेत विविध उपक्रम राबविले. तर राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने दुसऱ्यांदा मराठा आरक्षण साठी वेळ मागुन व मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतल्याने खुलताबाद तालुक्यातील सर्व उपोषणधारकांनी उपोषण मागे घेतले आहे.




महाराष्ट्र Business Katta












# धनगरांना एसटी, मराठ्यांना ओबीसी प्रमाणपत्र द्यावे



मल्हारराव डोणगांवकर
संपर्क क्र. ९६३७९३७५७९

आधुनिक केसरी

**आरक्षण ! आरक्षण !! आरक्षण !!! एव्हाना हे आरक्षण पदरात मिळावे यासाठी मागील ४० वर्षापासूनची मागणी आहे व दोन महिन्यापासून अख्ख्या महाराष्ट्रातील धनगर समाज व मराठा समाज पेटून उठला आहे. प्रसंगी मराठा समाज रस्त्यावर येऊन आमरण उपोषण, रस्ता रोको, निदर्शने या मार्गाने संघर्ष करत आहे तर धनगर समाजही सातत्याने लोकशही मार्गाने मोर्चे, निदर्शने, आंदोलने, निषेध करुन हा लढा देत आहे. एसटी आरक्षण, ओबीसी आरक्षण त्वरीत मिळावे म्हणून राज्य सरकारकडे सदैव मागणी करत आहे. परंतु या आरक्षणाला काही नेते, संघटना, पदाधिकारी हे विरोध करत आहे. तर काही जण दबक्या आवाजाने असेही म्हणत आहे की, आता कशाला पाहिजे आरक्षण ? आता तर आरक्षण बंद करण्याची वेळ आली आहे. आता कुणालाच आरक्षण नको, चालु आहे ते बंद केले पाहिजे. एकच आरक्षण जाहिर करा ते म्हणजे समान नागरी कायदा लागू करा.**

परंतु हे म्हणणे कुणालाही पटण्यासारखे नाही व सर्वस्वी चुकीचे वाटते. आरक्षण का नको ? आरक्षणाला विरोध कशासाठी ? विरोध करणाऱ्यांनी याची कारणमिमांसा जाणून घेतली पाहिजे, योग्य तो विचार केला पाहिजे.

२६ जानेवारी १९५० ला प्रजासत्ताक दिन अस्तित्वात आला. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटना संदर्भातील लोकशाही प्रणाली घटना संविधान लागू केले. त्यानुसार भारतीय जनतेला हक्क, अधिकार, स्वातंत्र्य, समता, बंधुता यानुसार प्रतयेक नागरीकाला स्वातंत्र्यपणे जीवन जगण्याचा हक्क व अधिकार प्रदान केले. या प्रणालीनुसार अनुसुचित जाती, जमाती, ओबीसी, भटक्या विमुक्त जाती, मागासवर्गीय सूचीनुसार आरक्षण घोषीत केले. पैकी एससी, एसटी असणाऱ्या जाती, जमातींना त्वरीत आरक्षण लागू करुन तेव्हाच १९५०-५६ ला अंमलबजावणी केली. यामुळे २६ जानेवारी १९५० पासून अनुसूचित जाती, जमातींना एससी, एसटी सेवासवलतीचे लाभ मिळत आहे. परंतु अन्य काही जाती, पोटजाती एसटी संवर्गात असणाऱ्या व ओबीसी संवर्गात असणाऱ्या यांना आरक्षण असूनही प्रत्यक्षात मिळत नाही, का तर आपमतलबी, स्वार्थी, स्वतची पोळी भाजणाऱ्या नेत्यांनी, मंत्र्यांनी याची अंमलबजावणी न करता धनगर व मराठा समाजाला आरक्षण मिळू दिले नाही. का तर ह्या समाजाला राजकीय, शैक्षणिक आरक्षण दिले तर उद्या आपल्या छाताडावर बसून, डोक्यावर बसून राज्यकर्ते जमात बनून सत्तास्थानी विराजमान होतील. ह्या भितीपोटी, आकसापायी लागू असलेले एसटी व ओबीसी आरक्षण देण्याची अंमलबजावणी आजपर्यंत केली नाही. यामुळे या समाजाला हक्काचे असलेले एसटी व ओबीसी आरक्षण मिळालेच नाही. तेंव्हापासून म्हणजेच ७५ वर्षापासून हा धनगर समाज, अन्य जाती, मराठा समाज अन्यायाच्या पिंजऱ्यात होरपळून निघत आहे, तो न्यायापासून वंचित आहे. खऱ्या अर्थाने या समाजाला स्वातंत्र्याचा सूर्य अर्थात एसटी आरक्षणाची भाकरी पदरात पडलीच नाही असे म्हटले तरी योग्य व उचित वाटेल.

तेंव्हा आरक्षण बंद करण्याची वेळ आली आहे, बंद करा ! बंद करा !! बंद करा !!! हे म्हणणे न पटणारे व सर्वस्वी चुकीचे आहे.

एकतर मागील ७५ वर्षापासून अन्यायाच्या पिंजऱ्यात गुरफुटत असलेल्या समाजाला सर्वप्रथम आरक्षण त्वरीत द्या, लागू करा. मग धनगर समाज असेल, मराठा समाज असेल, अन्य जाती, जमाती असेल. यांना या सेवा सवलती कमीत कमी पुढील १५ वर्षे उपभोगू द्या. नंतर तुम्ही म्हटले की, आरक्षण बंद करा हे सोयीस्कर वाटेल, अन्यथा नाही. तेंव्हा घटनेत, संविधानाने दिलेले हक्काचे आरक्षण हे कुणालाही,कोणत्याही व्यक्तीला,बालघेवड्या, मनशाही व आपमतलबी सरकारला, नेत्याला बंद करण्याचा अधिकार नाही. ते हिरावून घेता येणार नाही. हे वास्तविक सत्य कुणालाही नाकारता येणार नाही. आता सरकार म्हणेल एसटी आरक्षण कशाच्या आधारावर द्यायचे तर १९५० लाच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात तरतूद केली आहे की, धनगर समाजाला एसटी आरक्षणाची गरज आहे. त्यानुसार तेंव्हापासून केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या मागासवर्गीय सूचीत धनगर समाजाचा उल्लेख ३६ व २९ या स्थानावर एसटी संवर्गात आहे. कागदोपत्री १०१ पुरावे उपलब्ध आहेत. माहितीस्तव काही पुरावे नोंदी केंद्र शानाच्या यादीत - १) बिब्लिओग्राफी ऑन शेडयुल्ड कास्टसय ॲण्ड शेडयुल्ड ट्राईब्ज मार्जीनल कम्युनिटी १९६१ रजिस्टार जनरल इंडिया न्यु दिल्ली. २) बिब्लिओग्राफी ॲण्ड शेडयुल्ड कास्टस ॲण्ड शेडयूल्स ट्राईब्ज १९८२ रजिस्टार जनरल इंडिया न्यु दिल्ली, ३) मिनिस्ट्री ऑफ प्लॅनिंग डिपार्टमेन्ट ऑफ स्टॅटिकसटिक्स नॅशनल शॅम्पल सर्वे आर्गेनायजेशन्स दिल्ली - ६ सप्टेंबर १९८९ प्रा.प.ना. कोकणे यांना आलेले पत्र. ४) राज्यसभेत प्रश्नोत्तरात खासदास सुर्यकांत पाटील यांच्या प्रश्नास उत्तर देतांना मा. खासदार रामविलास पासवान यांनी ‟धनगड नही धनगर‟ ही मानकर चलते है असा खुलासा केला. दिनांक २२/१२/१९८५ राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग वार्षिक अहवाल २००७-२००८, २००८-२००९, २००९-२०१० नुसार महाराष्ट्र सरकारच्या यादीत नोंदी खालील प्रमाणे -

१) मुंबई ग्रामपंचायत कायदा १९५८ निवडणुक आयोगाच्या आदेशानुसार महाराष्ट्रात १३/०२/१९७८ पासून धनगर अनुसूचित जगात (एसटी). २) महाराष्ट्र सरकारकडून प्रकाशित झालेले दहाव्या रयतेचे पुस्तक यात अनुसूचित जमात एसटी उल्लेख. ३) मुद्रांक शुल्क माफी विषयी महाराष्ट्र गृह विभागाकडून प्रकाशित झालेले परिपत्रके १) १९९६, २) २००१, ३) २००५.



४) अनमिनिस्ट्रेशन ऑफ शेडयुल्ड एरियाज इन महाराष्ट्र २००१-२००२.

५) महाराष्ट सरकारकडून अध्यक्ष ॲण्ड गुंडेरावजी बनसोडे यांना आलेले पत्र दिनांक १४ मे २००८. असे असंख्य पुरावे मागील ३० वर्षापासून केंद्र सरकारला मागील सरकार मंत्री, नेते यांना देत आहोत. तसेच मागील राज्य सरकार व सध्याच्या सरकारलाही देत आहोत. पण कोरडे आश्वासना शिवाय दुसरे काहीही मिळत नाही.

आता मराठा ओबीसी आरक्षणाचे पुरावे -

१) मराठा (क्षत्रिय) आणि कुणबी हे एकाच जातीचे आहेत. निकाल दि. २५/१०/१९२१ हायकोर्ट ठराव. २) १९८१ ब्रिटिशकालीन स्थितीत लिखित पुरावा उपलब्ध आहे मराठा व कुणबी एकच आहे. ३) १९४६ साली विश्वरत्न बाबासाहेब आंबेडकरांनी शुद्र पूर्वी कोण होते ? हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाच्या माध्यमातून मनुवादी चातुर्वण्य अवस्र्‌ातील चवथ्या व सर्वात खालच्या वर्णाचा अर्थात शुद्राचा म्हणजेच ओबीसीचा इतिहास प्रथमच उजेडात आणला. हा ग्रंथ लिहून संविधानाच्या कामाला हात घातला. का तर बाबासाहेबांना शुद्राचा (ओबीसीचा) प्रश्न अत्यंत जिव्हाळयाचा व महत्वाचा वाटत होता. तेंव्हा संविधानात लिहितांना त्यावेळी आरक्षणाचा मुद्दा आला तेंव्हा बाबसाहेबांनी पहिल्यांदा ओबीसी समाजाचा विचार केला. ओबीसी समाजासाठी ३४० चे कलम अनुसूचित जातींसाठी ३४१ चे कलम, अनुसूचित जमातीसाठी ३४२ कलम तयार केले. ही कलमे घटना समितीत समाविष्ट केली.

परंतु उच्च वर्णियांनी यास विरोध केला. सरदार वल्लभभाई पटेल हे स्वतः ओबीसी असूनही कोण हे ओबीसी ? असा जाब डॉ. बाबसाहेबांना विचारला, परंतु डॉ. बाबासाहेबांचे कायदे विषयक अगाध ज्ञान, शिक्षण व अफाट माहिती या जोरावर बाबासाहेबांनी विरोध करणाऱ्यांना पटवून दिले की, ते मागास का आहेत ? त्यांना ओबीसी म्हणून सवलत देण्याची तातडीची गरज आहे, हे बाबसाहेबांनी पटवून दिले. अखेर २६ जानेवारी १९५० ला संविधान लागू झाले हे बिल संसदेत पास होऊ नये म्हणून तत्कालिन नेत्यांनी कडाडून विरोध केला. म्हणून २७ सप्टेंबर १९५१ ला डॉ. बाबासाहेबांनी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. १९५२ साल उजाडले. पहिल्यांदा सार्वत्रिक निवडणुका देशभरात घोषीत झाल्या. डॉ. बाबासाहेबांनी त्यांच्या जाहिरनाम्यात ३४० व्या कलमानुसार ओबीसीसाठी आयोग स्थापन केला. त्यांनी आयोागची अंमलबजावणी करणार असे आश्वासन द्यायला सुरुवात केली. अखेर २९ जानेवारी १९५३ ला दत्तात्रय बाबुराव उर्फ काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमला. ३० मार्च १९५५ रोजी कालेलकरांनी आपला अहवाल राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांना सादर केला. त्यांनी या आयोगाला विरोध केला. यामुळे अंमलबाजवणी सोडा तर हा अहवाल अहवालहीसंसदेत मांडला गेला नाही. पुढे स्वर्गीय इंदिरा गांधी या सत्तेवर आल्या. १९७६ साली त्यांनी आणीबाणी लागू केली. १९७७ ला सार्वजनिक निवडणुका आल्या. जनता पक्षाने ही लढवून कालेलकर अहवालाची अंमलबाजवणी करु, असे आश्वासन दिले. निवडणुकीत कॉंग्रेसचा पराभव होऊन जनता पक्षाचे राज्य येऊन मोरारजी देसाई पंतप्रधान झाले. ओबीसी शिष्टमंडळ त्यांना भेटले. कालेलकर कमिशनची अंमलबजावणी करा. तर ते म्हणाले ये तो पुराणा हो गया, अब ऐसा करेंगे नया बनाऐंगे १ जानेवारी १९७९ रोजी बिंदेश्वर प्रसाद मंडल ओबीसी खासदारांच्या नेतृत्वात नवा आयोग स्थापन झाला. ३१ डिसेंबर १९९० रोजी मंडल आयोगाचा अहवाल सरकारला सादर करण्यात आला. सामाजिक, शैक्षणिक, मागास जाती ३४४४ म्हणून नोंदी झाल्यात. पैकी ३६० जाती ओबीसी निष्पन्न झाल्या. तेंव्हा ओबीसीसाठी मंडल आयोग लागू करा ही मागणी जोर धरु लागली. यासाठी दलित व ओबीसी नेते यांनी देशव्यापी लढा उभारला. अनेकजण तुरुंगात गेले. अखेर ७ ऑगस्ट १९९० रोजी तत्कालिन प्रधानमंत्री विश्वनाथ प्रतापसिंग यांनी मंडल आयोग लागू करण्याची ऐतिहासिक घोषणा केली. यास मनुवादी वृत्तीच्या हिंदु संघटनांनी तीव्र विरोध केला. शेवटी कोर्टात खटला दाखल झाला. १६ नोंव्हेंबर १९९६ रोजी आयोगा विरोधी निकाल कोर्टाने दिला.

यामुळे ओबीसी आरक्षण घेण्यासाठी क्रिमिलियर हा नियम लावला. आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यावर जाता कामा नये असे कोर्टाने सुचित केले. ओबीसींना पदोन्नती नाही. देशात ३७४४ जाती असून तर प्रतयक्षातम १८९० जातींना ओबीसी आरक्षण मिळाले. या १८९० च्या यादीत मराठा या शब्दाचा उल्लेख टाळण्यात आला. यामुळे ओबीसींना मराठा समाजाला आरक्षण नाकारण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओबीसींना त्यांचे न्याय हक्क व अधिकार मिळवण्याचा मार्ग सुचित केला होता. पण वरील कोर्टाच्या निकालामुळे तो नाकारण्यात आला. तेंव्हा वंचित असेलेल्या हक्क व अधिकार हे ओबीसी मराठा समाजाला मिळाले पाहिजे. करीता धनगर समाजाला एसटी, मराठयांना ओबीसी आरक्षण प्रमाणपत्र देण्याची अंमलबजावणी सरकारने त्वरीत करावी हीच अपेक्षा.

# मराठी नाटकांच्या पर्वाला सुरुवात!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**दरवर्षी यादिवशीच रंगभूमीची प्रदीर्घ काळ सेवा करणाऱ्या कलावंताला विष्णुदास भावे पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. मागील काही काळात रंगभूमीवर पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, मनोरंजनपर, रहस्यमय असे वेगवेगळे विषय हाताळले जाता आहेत. १७० वर्षाची ही मराठी नाटकाची परंपरा येत्या काळात आणखीनच वृद्धिंगत होत राहो ही सदिच्छा! प्रकाशात उजळलेला भला मोठा रंगमंच.. लाल मखमली पडदा.. म्युझिकचा मंद स्वर, नेपथ्याची लगबग.. तिसरी घंटा.. आणि तुमची परीक्षा घेण्यासाठी समोर बसलेले प्रेक्षक, हे वातावरण डोळ्यासमोर येताच कोणत्याही रंगकर्मींच्या अंगावर काटा आल्यावाचून राहणार नाही. मागील कित्येक वर्षांपासून मनोरंजन आणि प्रबोधन यांची सांगड घालत नाटक संस्कृतीचा वारसा मनोरंजन विश्वात रुजत आहे. या रुजलेल्या बीजाची एक फांदी म्हणजे मराठी नाटक.**

सन १८४३ साली सीता स्वयंवर या नाटकाच्या रूपात सुरु झालेला हा प्रवास अलीकडच्या संगीत देवबाभळी, अनन्या, अलबत्त्या गलबत्त्यापर्यंत दिवसागणिक आणखीनच प्रगल्भ होत चालला आहे. मराठी रंगभूमीच्या सेवेत रुजू असणाऱ्या प्रत्येक रंगकर्मीसाठी ५ नोव्हेंबर हा दिवस अतिशय महत्वाचा आहे. या दिवशी मराठी रंगभूमी दिन साजरा केला जातो, हे तर सर्वांना ठाऊक आहेच पण त्यामागील कारण आपण जाणता का? सन १८४३ मध्ये सांगली येथे मराठी रंगभूमीचा पाया रचला गेला. चिंतामणराव पटवर्धन यांच्या आश्रयात विष्णुदास भावे यांनी ५ नोव्हेंबर १८४३ रोजी सीता स्वयंवर या नाटकाचा प्रयोग केला आणि तिथूनच मराठी नाटकांच्या पर्वाला सुरुवात झाली. सन १९४३ साली या दिवसाच्या स्मरणार्थ म्हणून या क्षेत्रातील सर्व नामवंत कलाकारांनी एकत्र येऊन सांगली येथे ५ ते ७ नोव्हेंबर या कालावधीत शताब्दी महोत्सव साजरा केला. या संमेलनाचे अध्यक्ष वि.दा.सावरकर हे होते. याच दिवशी नाट्यविद्येच्या संवर्धनासाठी अखिल महाराष्ट्र नाट्यविद्या मंदिर समिती स्थापन करण्यात आली. यावेळी सर्व नाट्य रसिकांच्या साक्षीने सांगली येथे समितीने ठराव करून हा दिवस मराठी रंगभूमी दिन म्हून घोषित करण्यात आला होता. दरवर्षी यादिवशीच रंगभूमीची प्रदीर्घ काळ सेवा करणाऱ्या कलावंताला विष्णुदास भावे पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. ज्याला रंगभूमी माहिती अशा प्रत्येकासाठी जागतिक रंगभूमी दिन महत्त्वाचा आहे. मराठी रंगभूमीला जवळ जवळ १७० हुनही जास्त वर्षांची परंपरा आहे. १८४३ ला नाटकाला डोक्यावर घेतलेल्या प्रेक्षकाने आजही त्याचा भार वाजत गाजत मिरवत पुढे आणला आहे.

दरवर्षी ५ नोव्हेंबर हा दिवस मराठी रंगभूमी दिन म्हणून साजरा केला जातो. विष्णूदास भावे यांनी १८४३ साली सीता स्वयंवर हे पहिले नाटक सांगली येथे रंगभूमीवर सादर करून मराठी नाट्यसृष्टीचा पाया घातला. १९४३ साली या घटनेचे स्मरण म्हणून राज्यातील या क्षेत्रातील सर्व नामवंत एकत्र आले आणि सांगली येथे ५ ते ७ नोव्हेंबर या कालावधीत शताब्दी महोत्सव साजरा करण्यात आला. या निमित्ताने ५ नोव्हेंबर रोजी नाट्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनाचे अध्यक्ष वि.दा.सावरकर हे होते. याच दिवशी नाट्यविद्येच्या संवर्धनासाठी अखिल महाराष्ट्र नाट्यविद्या मंदिर समिती स्थापण्यात आली. चिंतामणराव पटवर्धन यांनी दिलेल्या जागेवर विष्णूदास भावे यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नावाने उभारण्यात येणाऱ्या नाट्यमंदिराची कोनशिला



बसविण्यात आली. या महत्त्वाच्या क्षणी सर्व नाट्य रसिकांच्या साक्षीने सांगली येथे समितीने ठराव करून हा दिवस जाहीर केला. मराठी रंगभूमी दिनी सांगलीची अखिल महाराष्ट्र नाट्यविद्या मंदिर समिती सन १९६० सालापासून विष्णूदास भावे यांच्या स्मृत्यर्थ मराठी रंगभूमीवर दीर्घकाळ सेवा करणाऱ्या ज्येष्ठ कलाकाराला विष्णूदास भावे गौरवपदक देऊन त्यांचा सन्मान करते. गौरव पदक, ११ हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असते.

मराठी रंगभूमी दिन ५ नोव्हेंबर रोजी का साजरा केला जातो? मागील कित्येक वर्षांपासून मनोरंजन आणि प्रबोधन यांची सांगड घालत नाटक संस्कृतीचा वसा सुरू आहे. या वटवृक्षाचे एक देखणे मुळ म्हणजे मराठी नाटक. सन १८४३ मध्ये सीता स्वयंवरने सुरू झालेला हा प्रवास आजही किमान १७० वर्षानंतरही सुरूच आहे. सीता स्वयंवर, संगीत शारदा, संगीत सौभद्र, ती फुलराणी, सखाराम बाईंडर, घाशीराम कोतवा न्यूज आहे, एका लग्नाची तिसरी गोष्ट आणि आणखीन. गेले कित्येक वर्ष नाटक कधी थांबलं नाही कारण प्रेक्षकांनी ते थांबू दिलं नाही; काहीतरी नवं बघायला प्रेक्षक कुचारला पण म्हणून त्याने नाटकाचा हात कधी सोडला नाही. दि.५ नोव्हेंबर हा रंगभूमीवर काम करणाऱ्या प्रत्येकासाठीच फार महत्त्वाचा आहे. १८४३ मध्ये सांगली येथे मराठी रंगभूमीचा पाया रचला गेला. चिंतामणराव पटवर्धन यांच्या आश्रयात विष्णुदास भावे यांनी दि.५ नोव्हेंबर १८४३ साली सीता स्वयंवर या नाटकाचा प्रयोग केला आणि तिथूनच मराठी नाटकांच्या पर्वाला सुरुवात झाली. सन १९४३ साली या दिवसाच्या स्मरणार्थ या क्षेत्रातील सर्व नामवंत कलाकारांनी एकत्र येऊन सांगली येथे ५ ते ७ नोव्हेंबर या कालावधीत शताब्दी महोत्सव साजरा केला. या संमेलनाचे अध्यक्ष वि.दा.सावरकर हे होते. याच दिवशी नाट्यविद्येच्या संवर्धनासाठी अखिल महाराष्ट्र नाट्यविद्या मंदिर समिती स्थापन करण्यात आली. यावेळी सर्व नाट्य रसिकांच्या साक्षीने सांगली येथे समितीने ठराव करून हा दिवस मराठी रंगभूमी दिन म्हणून घोषित करण्यात आला होता.

!! सर्व रंगकर्मींना मराठी रंगभूमी दिनाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# पशु, पक्षी, प्राणी माणसाचे मित्र पण....?



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**मैत्री सारखं पवित्र नाव जगावेगळे आहे ते, नातेच वेगळे असतात म्हणून तर ज्यांनी, खऱ्या अर्थाने मैत्री निभावून दाखवले आहेत आज त्यांच्या मैत्रीला सारा जग वंदन करत आहे अशी असते मैत्री आणि तसे असतात मित्र म्हणून तर मैत्री करण्यासाठी मित्र, मैत्रींणीचा शोध घेत असतात. त्यातच एकदाची माणसाने केलेली मैत्री काही गैरसमजुतीमुळे तुटून जाते व त्या नात्याला वेगळे वळण येते, मैत्रीवरचा पूर्ण विश्वास उडून जातो तर काहींची मैत्री अतूट असते पण, याच भूमातेवर असेही काही निष्पाप, सुंदर, मायाळू, दयाळू, नि:स्वार्थी जीव आहेत की, त्यांच्यात असलेले खरे सदगुण पाहुन आजचा माणूस त्यांना आपला मित्र बणविण्यासाठी तयार असतो. त्यांच्यावर मित्रांसारखाच प्रेम करतो तेच मित्र म्हणजेच मुके पशु, पक्षी, प्राणी होत मग ते घरी पाळलेले असोत किंवा निसर्गाच्या सानिध्यात राहून स्वतंत्रपणे जगणारे असोत त्यांच्यावर एकदा , मन लागले की, त्यांचीच चिंता सतावत असते.**

कारण त्यावेळी त्यांच्याप्रती असलेली आपुलकी आणि जिव्हाळा असतो हे खरंच माणुसकीचे लक्षणे आहेत. पण हेच,लक्षणे व असाच धर्म कायस्वरूपी का बरं राहत नाही...? हा एक मोठा भारी प्रश्न आहे. ज्या पशु,पक्षांना आपला मित्र म्हणून त्यांचा स्वीकार करतात अ तशीच त्यांच्याबद्दल तेवढीच आपुलकी व त्यांच्या जीवनाची चिंता असायला पाहिजे पण,तसे आजकाल दिसून येत नाही. आजचा माणूस एवढा स्वार्थी झालेला आहे की, स्वतः च्या स्वार्थासाठी त्यांचे जगणे हिसकावून घेत आहे, त्यांच्या घरांवर कुऱ्हाड चालवत आहे प्लास्टिक मध्ये पालेभाज्या आणून तेच प्लास्टिक नको त्या ठिकाणी फेकून देत आहे एवढेच नाही तर असे नको ते, काम करतो म्हणूनच आजकाल मुक्या पशु,पक्षांचे ,प्राण्यांचे जीवन धोक्यात दिसत आहेत हे, वास्तव आहे मग यालाच म्हणतात का मैत्री करणे....? की,अजून काही...? ते तर बोलू शकत नाही ,सांगू शकत नाही, रडू शकत नाही पण त्यांनाही भावना असतात पण,आजच्या बोलत्या, चालत्या माणसाला तेही कळत नाही हेच फार मोठे दुर्दैव आहे. ते, पशु,पक्षी निसर्गाची सुंदर देण आहे त्यांच्यामुळे ह्या भूमातेची शोभा वाढत असते, माणसाला जगणे शिकवतात,एवढेच नाही तर आपल्या मंजूळ आवाजाने निसर्गालाही गहिवरून सोडतात किती त्यांच्यात गुण व आपुलकी आहे म्हणूनच कदाचित ह्याच गुणांमुळे ते माणसाला आवडत असतील... व प्रत्येक माणूस त्यांच्यावर प्रेम करत असतो, मैत्री करतो पण, त्यांच्यासाठी मात्र जगत नाही.

सध्याच्या घडीला बघितले तर पक्षांचा थवा लुप्त होण्याच्या मार्गावर दिसत आहे म्हणून कुठेतरी त्यांचा चिवचिवाट पाहिजे तेवढ्या प्रमाणात कानी पडत नाही. कारण,खायला त्यांना दाणे,पाणी, खाद्य मिळत नाही व राहायला झाड़ नाही, जागा नाही म्हणून ते खाण्यासाठी व निवारा शोधण्यासाठी वणवण भटकत फिरत असतात. या,भूमातेवर जन्म घेणारे सर्वच जिवजंतू निसर्गाची देण आहे पण, तीच देणचं बरीचशी नाहीसे होत आहेत. या प्लास्टिक वापरामुळे किंवा झाडे,झुडपे तोडण्याच्या वाढत्या प्रमाणामुळे कुठेतरी पर्यावरणाला धोका होत आहे. आजकाल जमीन कमी झाली व शुद्ध प्राणवायू हरवले आहे दुषित धुरांमुळे पर्यावरणाला धोका होत आहे, तापमानात वाढ होत आहे त्यामुळे माणसालाच नाही तर पशु,पक्षांच्या जीवाला सुध्दा धोका होत आहे म्हणून माणसाने एवढेही स्वार्थी होऊ नये, स्वतःला विसरू नये,माणुसकी धर्म विसरू नये. ज्या, पशु,पक्षांना आपला मित्र मानून आवर्जून त्यांच्याकडे बघून आंनदीत होऊन आपलेसे करून टाकतात तसेच त्यांच्यासाठी सुद्धा काही देणं लागतं. ते, कोणाचे शत्रू नाही, कोणला शत्रू मानत नाही मग माणसानेही त्यांचे शत्रू बणू नये, जसे त्यांना मित्र मानतात तसेच त्यांचे रक्षण करण्यासाठी प्लास्टिकचा वापर करणे सोडून द्यावे, त्यांना दाणे, पाणी,खाद्यांची सोय करून माणुसकीच्या नात्याने हा आपुलकीचे नाते निभवावे आणि हे एक बोलता, चालता माणूसच करू शकतो, फक्त मित्र माणण्यात ठेवू नये तर ते करून दाखवावे नक्कीच ते, पशु पक्षी, प्राणी पुन्हा एकदा नव्याने जगू शकतील कारण त्यांनाही जगण्याचा पूर्णपणे अधिकार आहे.



# ग्वांगझो कँटन फेअरचे एक्झिबिशन पाहून मसीहाचे सदस्य भारावले !

आधुनिक केसरी

**मराठवाडा असोसिऐशन फॉर स्मॉल स्केल इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर मसीहाने 14 ते 20 ऑक्टोबर 2023 या कलावधीत चीनमधील ग्वांगझू कँटन फेअर येथे व्यवसाय दौरा आयोजित केला होता. मसीहाच्या या दौऱ्यात 32 उद्योजक सदस्यांचे शिष्टमंडळ सहभागी झाले होते. कँटन फेअर हा जगातील सर्वात मोठे व्यापार व एक्झीबीशन होते .या एक्झीबीशनच्या माध्यमातून भारतीय उद्योगपतींना नवीन पुरवठादार आणि भागीदार शोधण्याची संधी मिळाली. त्यांची उत्पादने आणि सेवांचा प्रचार करण्यासाठी वाव मिळाला. हे एक्झीबीशन तीन टप्प्यांमध्ये विभागले होते . फेज १ मध्ये इलेक्ट्रोनिक्स, यंत्रसामग्री आणि वाहने आहेत. फेज २ मध्ये घर आणि बांधकाम साहित्य, वस्त्रे आणि वस्त्रे आहेत आणि फेज ३ मध्ये वैद्यकीय उपकरणे, क्रीडा आणि मनोरंजन उत्पादने आणि खेळणी आणि भेटवस्तू आहेत.**



कँटन फेअरच्या भेटीदरम्यान मसीहा शिष्टमंडळाने विविध प्रदर्शनांचे अन्वेषण केले आणि सभाव्य पुरवठादार आणि भागीदारांशी संपर्क साधला. चिनी उत्पादनांची गुणवत्ता, उच्च दर्जा अतिशय वाजवी किंमती पाहून भारावून गेले होते. शिष्टमंडळाने इलेक्ट्रिक टू-व्हीलर उत्पादन उद्योगालाही भेट देवून चीनी उत्पादन क्षेत्राबद्दल अधिक जाणून घेतले. सर्वजण चिनी उत्पादन क्षेत्राचे प्रमाण आणि कार्यक्षमतेने प्रभावित झाले.उत्कृष्ट पद्धतींच्या निर्मितीच्या बाबतीत आम्ही चिनी लोकांकडून बरेच काही शिकण्यास मिळाले नी नेटवर्क करण्याचीही संधी मिळाली. या भेटी दरम्यान अनेक संभाव्य पुरवठादार आणि भागीदारांना भेटल्याने आमच्या सदस्यांसाठी नवीन व्यवसाय संधी मिळतील. चिनी लोकांची शिस्त आणि सुव्यवस्थितपणा पाहून मसीहाचे शिष्टमंडळही प्रभावित झाले. आ चीनमध्ये 60% स्त्रिया काम करत आहेत. तेथील स्त्रीयांच्यां मुळेच त्यांच्या देशाच्या आर्थिक विकासात त्यांचे मोठे योगदान आहे.आपल्याही स्त्रीयांना आपणं व्यवसाय.. उद्योग क्षेत्रात सहभागी करुन घेणे गरजेचे आहे. मसीहाच्या शिष्टमंडळाचे अध्यक्ष अनिल पाटील, उपाध्यक्ष अर्जुन गायकवाड, सचिव विकास पाटील आणि टूर कन्व्हेयर दिलीप चौधरी यांनी दौर यशस्वीपणे आयोजित केल्या मुळेच आपल्या कडील उद्योजकांना खूप मोठं मार्गदर्शन मिळाले हे बाकी खरं...मसीहाच्या या दौऱ्यामुळे आपल्या उद्योजकांना बाजारपेठ शोधण्यासाठी आणि नवीन पुरवठादार आणि भागीदार शोधण्यासाठी नवीन दरवाजे उघडले.आपण कुठे आहोत आणि आपल्यात काय बदल केला पाहिजे. याची जाणीव झाली.या दौऱ्यातील ५२ सदस्यांपैकी अधिक सदस्य हे खूप तरुण असल्याने त्यांच्या व्यवसायात त्यांना हा दौरा विलक्षण मार्गदर्शनीय होणार असल्याने त्यांनी मसीहाच्या सर्व पदाधिकारी मंडळीचे मनापासून ऋण व्यक्त केले....

**चेतन राऊत**
लेखक मराठवाडा असोशिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर मसीहाचे उपाध्यक्ष आहेत
मो.नं.9370007181



जेजुरी - जयाद्री, पुरंदर, पांगारे, शिवगंगा खोऱ्यात नवरात्र विजयदशमीची मानकरी असलेली विविध प्रकारची फुलशेती शेतकऱ्यांच्या, फूल उत्पादकांच्या काबाडकष्टातून बहरली आहे. सण उत्सवाकरिता फुलांची तोडणी चालू असून शेतकऱ्यांना फूल उत्पादकांची चिंता वाढली आहे ती फूल शेती व्यवसायाला प्लास्टिक फुलांच्या अतिक्रमणाने लागलेल्या ग्रहणामुळे. जयाद्रीच्या पुरंदर तालुक्यातील शिवरी, पांगारे परिंचे, काळदरी, रानमळा, परिसरातील पारंपरिक फूलशेती उत्पादकांनी गणपती, नवरात्र, विजयदशमी सण उत्सवाकरिता विविध प्रकारची फूलशेती फुलवली. परंतु अपेक्षित दर आणि पूर्वीसारखी मागणी न मिळाल्याची खंत. त्यातच प्लास्टिक फुलांच्या अतिक्रमणामुळे शिवरी परिसरातील कामथे आणि गोगावले परिवाराने नाराजी व्यक्त केली आहे. सध्या फूलशेती रंगीबेरंगी विविध फुलांनी बहरल्यामुळे शेतीचे सौंदर्य फुलले आहे. परंतु वाढत्या प्लास्टिक फुलांना बंदी करणेबाबत सरकारने ठोस पावले उचलवीत अशी मागणी देखील फूल उत्पादकांनी केली आहे. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

# क्षणभंगुर जीवन सारे...



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**कर्मरेषा नाही राजा, भाग्यरेषा बोलत आहे... पाप -पुण्याचा हिशोब, सारा इथेच तोलत आहे... जीवनातले अंतिम सत्य म्हणजेच 'मृत्यू'... या सृष्टीत जो जीव जन्माला येईल त्याला मृत्यूला सामोरे जावेच लागणार. फक्त प्रत्येकाचा मृत्यू हा वेगवेगळ्या प्रकारे येणार... पण येणार हे मात्र निश्चित... कारण जीवन हे क्षणभंगुर आहे. माणूस जोपर्यंत जीवन आहे. तोपर्यंत ध्येयाच्या पाठीमागे धावत राहतो. व आजच्या जगातील माणसाचे एकमेव ध्येय म्हणजे पैसा कमावणे. गाडी, बंगला, दाग -दागिने, महागडे कपडे,इ. सर्व प्रकारच्या सुखसोयी मिळवणे हेच आहे. या सुख सोयी मिळाल्या तरी तो थांबायला तयार नाही. पैसा कमावण्याची त्याचीही ओढ संपतच नाही. जसा तो पैसा कमवत जातो. तशा त्याच्या गरजाही वाढत जातात. व त्या गरजा पूर्ण करण्यासाठी पुन्हा तो सदैव धावत राहतो.**

या धावपळीत तो असलेल्या सुखांचाही उपयोग घेऊ करून घेऊ घेत नाही. आज सर्वत्र हेच चित्र आपणास पहावयास मिळत आहे.

जीवन जगण्यासाठी पैसा अर्थातच आवश्यक आहे. परंतु माणूस बऱ्याचदा जीवन जगण्यासाठी पैसा कमावण्यापेक्षा पैसा कमावण्यासाठीच जगताना दिसतो. या धावपळीत बऱ्याचदा तो माणुसकी ही विसरतो. जवळच्या नात्यांना म्हणावा तेवढा वेळ देऊ शकत नाही. जीवनाच्या एका वळणावर कुठेतरी थांबले पाहिजे असे मला वाटते. कारण पैसे कमावण्याची ही ओढ कधीच संपणारी नसते. बऱ्याचदा जशी आर्थिक स्थिती असते तसेच खर्च व राहणीमान असल्याचे आपल्याला दिसते. परंतु काही लोकांना मराठीतील एका प्रसिद्ध म्हणीप्रमाणे, "रीन काढून सण करायची हौस असते."अशा लोकांचे आर्थिक नियोजन अर्थातच कधीच जुळत नाही. आपल्या मराठी भाषेत आणखी एक म्हण प्रचलित आहे." अंथरूण पाहून पाय पसरावेत."याचा अर्थ असा मुळीच नाही की, माणसाने मोठी स्वप्ने पाहू नयेत. किंवा आहे त्या परिस्थितीत बदल करण्याचा प्रयत्नच करू नये. तर हळूहळू एक- एक पायरी चढून स्वप्न पूर्ण करण्याचा माणसाने निश्चित प्रयत्न केला पाहिजे. परंतु एकदाच फार मोठी झेप त्याने घेतली तर त्यात त्याचेच नुकसान होते. म्हणून हळूहळू प्रगतीच्या मार्गाने केलेले मार्गक्रमण केंव्हाही त्याच्यासाठी हितकारक असते. या धावपळीत अनेकदा त्याचे आयुष्यही उद्ध्वस्त होते. माझ्या कवितेच्या या पुढील ओळीतून हेच तर सांगावेसे वाटते...

**माझे -माझे म्हणोनिया,**
**जीवन सारे जगायाचे...**
**अनंताच्या प्रवासाला ,**
**रित्या हाती निघायाचे...**
**हाच धर्म जीवनाचा,**
**पिढ्या-पिढ्या चालत आहे...**
**भाग्य रेषा नाही...**

दैनंदिन जीवन जगताना आपण अनेक उदाहरणे पाहतो. एखादा तरुण धडधाकट व्यक्ती चालता-बोलता या जगातून निघून जातो. निमित्त काही का असेना. उदा. अपघात, घात,आत्मघात, आजार, इ.पण त्यामुळे त्याची सारी स्वप्न अर्धवट राहतात. त्याचे कुटुंब उद्ध्वस्त होते. म्हणून जगता येईल तेवढे आनंदाने व एकमेकांशी प्रेमाने कसे जगता येईल याचा प्रयत्न माणसाने केला पाहिजे.

काही दिवसांपूर्वीचे उदाहरण घ्या ना... एकेकाळी सर्व मराठी चित्रपट रसिकांच्या हृदयावर अधिराज्य गाजवणारे सुपरस्टार, व ज्यांना मराठीतील विनोद खन्ना असे संबोधले जायचे, ते देखणे व्यक्तिमत्व लाभलेले जेष्ठ अभिनेते रवींद्र महाजनी यांचे झालेले निधन सर्वांसाठीच धक्कादायक होते. कोणी स्वप्नांतही विचार केला नसेल की एका प्रसिद्ध अभिनेत्याला असे एकाकी मृत्यूला सामोरे जावे लागेल. रवींद्र महाजनी यांच्या सोबतच मराठीतील प्रसिद्ध अभिनेत्री रंजना देशमुख यांनाही खूप दुर्दैवी मृत्यूला सामोरे जावे लागले. त्यांच्यासारखाच मृत्यू हिंदी चित्रपट सृष्टीतील काही अभिनेत्यांना आलेला आहे. सुप्रसिद्ध अभिनेत्री परवीन बाबी, श्रीदेवी,राजेश खन्ना,या आणि अशा



कितीतरी जणांची नावे आपल्याला सांगता येतील. या सर्वांनी एकेकाळी सुवर्णकाळ अनुभवला होता. त्यांना कधीच वाटले नसेल आपल्याला असा एकाकी मृत्यू येईल. भारतरत्न लता मंगेशकर यांना आपण गाण कोकिळा म्हणतो. त्यांनी त्यांच्या निधनापूर्वी काही भावना व्यक्त केल्या होत्या. त्या म्हणाल्या होत्या की,"मी एकेकाळी मोठ्या- मोठ्या गाड्यांमध्ये फिरले. आज एका व्हीलचेअरवर आहे... कधीकाळी अनेक देशांमध्ये प्रवास केला. आज हॉस्पिटलच्या एका रूम मध्ये बंदिस्त आहे... कधी माझे केस विंचरण्यासाठी अनेक एक्सपर्ट असत... आज माझ्या डोक्यावर एकही केस नाही... माझ्या अनेक प्रकारच्या साड्यांनी कपाट भरलेले आहे. परंतु माझ्या अंगावर आज हा साधा गाऊन आहे".या व अशाच प्रकारच्या अनेक भावना त्यांनी व्यक्त केल्या. यावरून एकच स्पष्ट होते की, मृत्यू हे जीवनाचे अंतिम सत्य आहे. म्हणून जोपर्यंत जीवन आहे तोपर्यंत एकमेकांशी होता होईल तेवढे प्रेमाने वागावे. इतरांच्या संकटात मदतीला उभे राहावे... अनेक लोक मंदिरांमध्ये जातात. पूजा करतात. परंतु जिवंत माणसाशी माणुसकीने वागत नाहीत. अशा लोकांना संत गाडगेबाबांनी सुद्धा , "माणसात देव शोधा असाच संदेश दिला आहे". व कवितेच्या पुढील ओळींमधून सुद्धा हाच संदेश मिळतो.

**माणसातं शोधू देव,**
**माणुसकीतं धर्म पाहू...**
**संकटात एखाद्याच्या,**
**मदतीला उभे राहू...**
**कर्म माणसाचे रोज,**
**खेळ नवा खेळत आहे...**
**भाग्य रेषा...**

एखादा व्यक्ती कितीही श्रीमंत असला ,प्रसिद्ध असला, तरीही तो उपचार करून काही काळ मृत्यूला पुढे ढकलू शकेल पण टाळू मात्र शकत नाही. काही व्यक्तींना तर उपचार करण्यासाठी सुद्धा वेळ मिळत नाही. अनेक माणसांना जीवनाचा डाव अर्ध्यावर सोडून जावे लागले. त्यामुळेच असेच वाटते की, हे जीवन क्षणभंगुर आहे. जीवनात घेता येईल तेवढा आनंद घेण्याचा प्रयत्न करावा. व इतरांनाही देता येईल तेवढा आनंदच द्यावा... म्हणतात ना ...,"मरावे परी कीर्ती रुपी उरावे"कवितेच्या शेवटच्या ओळींमधून हेच तर **सांगावेसे वाटते.**

**जिव्हाळ्यांने जपू नाती,**
**एकमेकां देऊ साथ...**
**कधी खचल्या मनाला,**
**देवू आधाराचा हात...**
**क्षणभंगुर जीवनाचा,**
**थांग कुणा लागत आहे...**
**कर्म रेषा नाही राजा, भाग्यरेषा बोलत आहे...**

# मायेचा ओलावा आटतोय.....



बुद्धभूषण चं. कांबळे
संपर्क क्र. 7498715661

आधुनिक केसरी

**एकेकाळी माणसाच्या मनात माणसाबद्दल माया, आपूलकी व प्रेम हे ठासून भरले होते.माणूस माणसाला किंमत देत होता. एकमेकांच्या सुख दुःखात व संकटात वेळोवेळी धावून जात होता.मित्र नातेवाईक व आप्तेष्ट यांना जिवापाड जपले जायचे व त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला तर तिसऱ्याच्या डोळ्यातून पाणी यायचे. एवढे जिवाला जीव देणारे माणसे समाजात होती. तेव्हा अर्थिक व सामाजिक कार्य निस्वार्थ भावनेने केले जायचे.परंतू सांगायचा मुद्दा काय तर आजकाल प्रत्येकाच्या घरात मायेचा ओलावा जपणारी माणसे माणूसकीला जिवापाड जपत होते.**

तेव्हा एकत्र कुटुंब पद्धत अस्तित्वात होती. एका भावाला वेदना झाल्या तर दुसरा भाऊ अश्रू ढाळायचा.एक भाऊ संकटात अडकला तर दुसऱ्या भावाचा जीव कासावीस व्हायचा. एवढे भावाभावात प्रेम माया व आपूलकी ठासून भरली होती. दुसरी एक महत्वाची बाब म्हणजे एखादा व्यक्ती जर गावात मरण पावला तर गावभर हळहळ व्यक्त केली जायची व तेव्हा अंत्यविधीला गेल्यावर प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू यायचे.एवढा मायेचा ओलावा प्रत्येक माणसाच्या हृदयात ठासून भरला होता. परंतू हल्ली काळ बदलला,परिस्थिती बदलली व काळाच्या ओघात माणसेही बदलत गेली. माणसे कठोर व निष्ठूर हृदयाची होऊन बसली. तसेच मतलबी व स्वार्थी वृत्ती वाढीस लागली आणि प्रेमाचा व मायेचा झरा आटायला लागला.आणि



माणूस कपटी व धूर्त वृत्तीने वागायला लागला. विभक्त कुटूंब पद्धत अस्तित्वात आली.भाऊ भावात राहीला नाही व लेक बापात राहीला नाही. भावाचेच भले झाल्याले भावालाच बघवत नाही. भावाने दुचाकी घेतली तर दुसरा भाऊ चारचाकी घ्यायच्या तयारीत असतो. एवढी मोठी स्पर्धा आता भावाभावात लागली आहे. म्हणजेच थोडक्यात भावकीत लागली आहे. परक्याचा मुलगा अधिकारी झाला तरी चालतो पण भावकीतला व्यक्ती अधिकारी झाला किंवा मोठ्या पोस्टवर गेला तर यांचा जळफळाट उठतो. एवढी गहाण नितिमत्ता लोकांची झाली आहे.सक्के भाऊ पक्के वैरी बनून कोर्ट कचेरीची पायरी चढत आहेत.आणि एकमेकांना पाण्यात बघत आहेत.काही महाभाग तर सख्खा भाऊ मेल्यावर भावाच्या मातीला सुध्दा जात नाहीत.हल्ली इतका बेकार जमाना निघालाय. म्हणूनच मला मूद्दाम म्हणावेसे वाटते की अरे माणसा कधी होशील रे माणूस? तेव्हा समस्त जणतेला कळकळीची नम्र विनंती करतो की, मित्रहो हे जीवन क्षणभंगूर आहे.येथे कोणालाच काही घेऊन जायचे नाही.जसे आलो तसे एकदिवस जाणारच तेव्हा सगळ्यांशी बोलून चालून राहा. जीवनात माणसे कमवायला शिका कारण हे मानवी जीवन पाण्यावरचा बुडबूडा आहे.तो कधी फुटेल याचा काही नेम नाही आणि आपण या जगातून कधी नाहीसे व्हाल हेही आपल्याला सांगता येत नाही. म्हणून कधीच कोणत्या गोष्टींचा गर्व व अहंकार मनात बाळगू नका. सगळ्यांशी प्रेमाने,मायेने व मैत्री भावनेने राहा. हल्ली मायेचा ओलावा आटतोय तो मायेचा झरा आटू देऊ नका..! हिच जाता जाता माझ्या समस्त बांधवांना कळकळीची नम्र विनंती...

# अविनाश पाटील साई सन्मान पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** अविनाश विश्वनाथ पाटील एक समाजातील चांगल व्यक्तिमत्व असून ते गेली ३२ वर्षे माझगाव डॉक कंपनीत वरिष्ठ भांडारपाल म्हणून सेवा केली. ३१ ऑक्टोबर २०२३ तारखेला ते शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले. वहाळगावचे पंचायत समिती माजी सभापती विश्वनाथ शेठ पाटील यांचे ज्येष्ठ पुत्र आहेत. अविनाश विश्वनाथ पाटील हे सेवानिवृत्त झाले पण त्यांचा लोकांना मदतीचा हात असतो. त्यांच्या सौभाग्यवती वंदना अविनाश पाटील या सुद्धा पनवेल पंचायत समितीच्या सभापती होऊन गेल्या पण सत्तेचा कधी माज केला नाही. या शब्दात वहाळ साई मंदिरचे अध्यक्ष रवीशेठ पाटील यांनी अविनाश पाटील यांच्या बाबत गौरवोदगार काढले. अविनाश पाटील सेवानिवृत्त झाल्यानंतर श्री साई देवस्थान साईनगर वहाळ येथे त्यांचा देवस्थानतर्फे साई सन्मान पुरस्कार देऊन त्यांना गौरवण्यात आले.





# आला थंडीचा महिना...



हळू हळू थंडीचे प्रमाण वाढू लागले असल्या मुळे शेकोटी पेटू लागली आहे. कन्नड येथे सरस्वती कॉलोनीत शेकोटीची ऊब घेताना हे चिमुकले.

# तूर, कापूस पिकाआड गांजाची शेती; तीन कोटींची झाडे केली जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शिरपूर तालुक्यातील लाकड्या हनुमान शिवारात तूर आणि कापूस पिकाच्या मधोमध तीन कोटी रुपयांच्या गांजाची लागवड केल्याचा प्रकार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने उघडकीस आणला. या कारवाईत सहा हजार दोन किलो गांजाची झाडे जप्त करण्यात आली. शिरपूर तालुक्यातील एकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.लाकड्या हनुमान शिवारातील देवा पावरा याने त्याच्या शेतात तूर आणि कापूस पिकाच्या मधोमध गांजाची लागवड केल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंद यांना मिळाली. त्यानुसार अधीक्षक संजय बारकुंड यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक दत्तात्रय शिंदे, शिरपूर तालुका पोलीस ठाण्याचे सहायक निरीक्षक जयेश खलाणे, उपनिरीक्षक बाळासाहेब सूर्यवंशी, पोलीस नाईक पंकज खैरमोडे, महेंद्र सपकाळ, मयुर पाटील, योगेश जगताप, किशोर पाटील, जगदीश सूर्यवंशी, देवेंद्र ठाकूर यांच्या पथकाने देवा पावरा हा कसत असलेल्या शेताचा शोध घेतला. तेथे पाहणी केली असता शेतात तूर आणि कापूस या पिकांच्या मध्यभागी गांजाची लागवड केल्याचे आढळून आले. यावेळी त्या भागातील स्थानिकांनी पोलिसांना विरोध केला.



# लाच स्वीकारताना मंडळ अधिकाऱ्यास अटक

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे:** शेतजमिनीच्या सातबारा उताऱ्यावर नाव लावण्यासाठी दोन हजार रुपयांची लाच स्वीकारताना शिरपूर तालुक्यातील जवखेडा येथील मंडळ अधिकाऱ्यास धुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने अटक केली. तक्रारदाराच्या वडिलांच्या नावे शिरपूर तालुक्यातील वरूळ येथे शेतजमीन आहे. ती तक्रारदार व त्यांची बहीण यांच्यात वाटणी करून देण्याबाबत शिरपूर येथील वरिष्ठ दिवाणी न्यायालयाच्या आदेशावरून तक्रारदाराने आदेशाची प्रत जोडून शिरपूर तहसीलदार यांच्याकडे शेतजमीन नावे करून देण्यासंबंधी ३० ऑगस्टला अर्ज जमा केला होता. त्यावरून तहसीलदारांनी पुढील कार्यवाहीसाठी सदरचा अर्ज १२ सप्टेंबरला तलाठी वरूळ यांच्याकडे पाठविला.तलाठी व मंडळ अधिकारी यांनी तक्रारदार यांच्या अर्जावर कार्यवाही करून शेतजमिनीच्या सातबारा उताऱ्यावर नावे लावली. त्यानंतर जवखेडा भागाचे मंडळ अधिकारी मुकेश भावसार याने नाव लावण्याचे काम करुन दिले म्हणून दोन हजार रुपयाची मागणी केली. तक्रारदाराने धुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. त्यानुसार धुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने दोन हजारांची लाच स्वीकारताना पकडले. भावसारविरुध्द शिरपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

# सचिन ठाकूर यांच्या वाहन जळीत प्रकरणातील आरोपीवर खटला

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** सुप्रसिद्ध नृत्य दिगदर्शक, आई तुझे देऊळ फेम, हिंदुस्थान रत्न राष्ट्रीय पुरस्कार तथा महाराष्ट्र भूषण श्री सचिन लहू ठाकुर यांची MH46BV2266 क्रमांकाची मारुती सिलेरिओ गाडी अज्ञात इसमानी जसखार ग्रामपंचायत निकालानंतर एका वर्षात सलग दोन वेळ त्यांच्या घरा शेजारी पार्किंग मध्ये जाळली होती. जानेवारी महिन्यात जेव्हा पहिल्यांदा गाडी जाळली तेव्हा शॉर्ट सर्किटमुळे गाडी जळाळी असेल असा प्राथमिक अंदाज न्हावा स्टेशन पोलीस अधिकारी ह्यांनी व्यक्त केला होता परंतु त्याच वर्षी दुसऱ्यांदा ऑगस्ट महिन्यात सचिन ठाकुर यांची गाडी जाळण्यात आली. त्यामुळे सचिन ठाकुर यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसानीस सामोरे जावे लागले.

सदर घटने चे गांभीर्य लक्षात घेता वाढते गुन्हेगारी चे प्रमाण बघता न्हावा शेवा पोलीस स्टेशन च्या अधिकारी यांनी सदर प्रकरणाची उच्च स्तरीय चौकशी केली व सदर गुन्ह्यात कु. करण भरत घरत राहणार जसखार याला मुख्य आरोपी म्हणून पकडण्यात आले. सदर गुन्हा राजकीय द्वेष मनात ठेऊन करण्यात आला. पण हा गुन्हा कोणाच्या सांगण्या वरून केला हे अजून निष्पन्न झाले नाही. आता हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे या गुन्ह्या मागील प्रमुख सूत्रधार कोण आहेत हे लवकरच न्यायालय समोर येणार आहे.

सदर गुन्हे प्रकरणात न्हावा शेवा पोलीस स्टेशन अधिकारी यांना आरोपी शोधण्यात यश आल्याने युवा सामाजिक संस्था व सचिन ठाकूर च्या हितचिंतकांनी पोलीस प्रशासनाचे अधिकारी वर्गाचे आभार मानले.व भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नये या करीता तरुणांनी राजकीय नेत्यांचा अमिषाला बळी न पडता अशा प्रकारचे गंभीर कृत्ये न करता आपला व आपल्या कुटुंबाचा भविष्या चा विचार करावा असे प्रतिपादन न्हावा शेवा स्टेशन च्या अधिकारी यांच्या वतीने करण्यात आले आहे.



सर्व प्रथम मी न्हावा शेवा पोलीस स्टेशनच्या सर्व पोलीस प्रशासनाचे, पोलीस अधिकाऱ्यांचे आभार मानतो . राजकीय द्वेषातून वाहन जाळल्याने सदर संबंधित आरोपीवर कडक अशी कायदेशीर कारवाई करण्यात यावी . तसेच मूळ आरोपी कोण आहे याचाही शोध पोलिसांनी घ्यावा अशी मी विनंती करतो . आरोपीवर जास्तीत जास्त कडक कारवाई व्हावी . **– सचिन ठाकूर,प्रसिद्ध नृत्य दिग्दर्शक,कलाकार, जसखार**

# अय्युब पठाण यांना बालसाहित्य पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** कोल्हापूर येथील मराठी बालकुमार साहित्य सभा यांच्यावतीने सन २०२० या वर्षातील मराठवाड्याचे प्रसिध्द बालसाहित्यिक अय्युब पठाण लोहगांवकर यांच्या, 'आईचा हात' या दर्जेदार व आशयघन बालकविता संग्रहाला उत्कृष्ठ साहित्य निर्मितीचा राज्यस्तरीय पुरस्कार प्रसिध्द साहित्यिक डॉ. श्रीकांत पाटील यांनी पोस्टाने घरपोच सन्मानपूर्वक पाठविले आहे. या पुरस्काराचे स्वरूप स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, आणि रोख रक्कम असे होते. 'आईचा हात' या बालकविता संग्रहाला आता पर्यंत बारा राज्यस्तरीय बाल साहित्य पुरस्कार मिळालेले आहे. अय्युब पठाण यांचे सर्वत्र स्वागत होत आहे. अय्युब पठाण यांची आतापर्यंत अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही पठाण यांनी उच्च शिक्षण घेतले आहे.




# बेपत्ता युवकाचे शव विहिरीत तरंगताना आढळून आले, कुटुंबियांत खळबळ

आधुनिक केसरी न्यूज



**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील वसंतराव पंडितराव सोनवणे ( ३६ ) हा युवक तीन दिवस बेपत्ता होता. कुटूंबातील नातेवाईकांनी सर्वत्र तपास केला परंतु तो मिळून आले नाही. मात्र दि.४रोजी कनकशीळ रस्ता सबस्टेशन जवळ राहत असलेल्या ठिकाणीच पाठीमागे शेत गट क्रमांक ७५६ विहिरीत त्यांचे शव तरंगत आढळून आल्याने कुटूबीयात एकच खळबळ उडाली. या संदर्भात पोलिस पाटील कारभारी नरवडे यांनी दुरक्षेत्र पोलिस चौकीला घटनेची खबर दिली.खबर मिळताच पोलिस कांन्सटेबल संजय सपकाळ, संतोष भालेराव, संतोष पुंड पोलिस कर्मचार्यांना जायमोक्यावर धाव घेतली तर नागरिकांच्या साह्याने शव काढून पंचनामा करून मृतदेह प्राथमिक आरोग्य केंद्र येथे शवविच्छेदन साठी दखल केले. वैदयकीय अधिकारी डॉ.अंजुम निलोफर, डॉ पालकर यांनी शवविच्छेदन करुन शव नातेवाईकांच्या ताब्यात दिले. तदनंतर रात्री त्यांवर अंत्यसंस्कार करण्यात आले. युवकाच्या पाश्चात पत्नी, दोन मुले, आई,भाऊ,वहिनी परिवार असुण अपघाती मृत्यू ने नागरिकांतून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# दोन्ही मुले देशसेवेसाठी गेल्यामुळे आई वडिलांना आकाश झाले ठेंगणे

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील सोबलगाव येथील एका शेतकरी कुटुंबातील एक मुलगा नौदलात एस.एस.आर. पदावर, तर एक मुलगा सैन्य दलात तांत्रिक पदावर निवड झाल्याने शेतकरी आई वडिलांना आनंद गगनात मावेनासा झाला असून त्यामुळे त्यांना आकाश ठेंगणे झाल्या सारखे वाटू लागले आहे, अशी प्रतिक्रिया मुलांचे वडील बाबासाहेब गायकवाड यांनी दिली आहे. प्रबळ इच्छाशक्ती मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर एकाच कुटुंबातील या भावंडांनी यश मिळवले. तालुक्यातील सोबलगाव येथे गायकवाड कुटुंब राहते बाबासाहेब गायकवाड हे पत्नी व दोन मुलांसोबत राहतात. त्यांनी शेती करून आपल्या दोन्ही मुलांना उच्चशिक्षित केलं आहे. त्यांनी परिस्थिती हलाखीची असल्यामुळे कुठल्याही प्रकारचे क्लास लावले नाही, व कुणाचेही मार्गदर्शन घेतले नाही, अभिषेक बाबासाहेब गायकवाड नौदलात एस.एस.



आर. पदावर तर विशाल बाबासाहेब गायकवाड सैन्य दलात तांत्रिक पदावर भरती झाल्याने त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक केले जात आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम
परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा

- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन



अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# फुलंब्री तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करा: जिल्हाध्यक्ष काशिनाथ जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे :** फुलंब्री तालुक्यात दुष्काळ सदृस परिस्थिती असतानाही शासनाने जाहीर केलेल्या दुष्काळग्रस्त तालुक्याच्या फुलंब्री तालुक्याचा समावेश केलेलं नाही त्यामुळे तालुका तत्काळ दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करावा, फुलंब्री तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करून कपाशी पिकांवर लाल्या रोगाचे आक्रमण झाल्यामुळे शासनाने अनुदान जाहीर करावी, असे मागणी जिल्हाध्यक्ष काशिनाथ जाधव शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटना यांनी मागणी केली आहे. माननीय कृषिमंत्र्यांनी याबाबत निर्णय घ्यावा जेणेकरून फुलंब्री तालुक्यात अगोदरच कमी पावसामुळे पिकांना फटका बसला. त्यात कशीबशी वाचलेले कपाशी पीक आता लाल्या रोगामुळे संकटात सापडले आहे. हा रोग आटोक्याबाहेर गेल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाले असून कपाशी अनेकांनी कपाशी उपटणे सुरू केले आहे. फुलंब्री तालुक्यात गेल्या दीड ते दोन महिन्यापासून पाऊस नसल्याने शेतकऱ्यांनी कसेबसे विहिरीच्या पाण्यावर कपाशी वाढवली; मात्र आता कपाशीवर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव झाला असून झाडांची पाने लाल पडली आहेत. तसेच झाडांची वाढ खुंटली आहे. त्याचबरोबर त्यांना कन्या लागण्याचे प्रमाण देखील कमी झाले आहे. त्यामुळे उत्पन्नात घट येणार असून केलेला खर्च वाया जाण्याची शक्यता आहे. शेतकरी महागडी औषधी फवारून पिके वाचविण्याचा अटोकाट प्रयत्न करीत आहेत. मात्र हा रोग आटोक्यात येत नसल्यामुळे अनेकांनी कपाशी उपटून फेकणे सुरू केले आहे.



सुरुवातीपासून कपाशी तळहाताप्रमाणे वाढविली . त्यात पावसाने दगा दिल्यामुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले . यातून कशीबशी वाचविलेल्या कपाशीवर लाल्या आल्याने खर्च करूनही काहीही फायदा झालेला नाही . पीक हातचे गेले आहे . त्यात आता शासनाने दुष्काळग्रस्त यादीतून आपला फुलंब्री तालुका वगळलेला आहे अखेर या सरकारच्या मनात आहे तरी काय शेतकऱ्यांना जगू द्यायचे की मरण द्यायचं म्हणून शासनाने वरील बाबींचा विचार करून फुलंब्री तालुक्या दुष्काळग्रस्त जाहीर करावा .

**काशिनाथ जाधव जिल्हाध्यक्ष, शरद जोशी शेतकरी संघटना युवा मंच महाराष्ट्र राज्य**



# जवळ्यात 'माझा वाढदिवस माझा सन्मान' उपक्रमास प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** शालेय जीवनात विद्यार्थ्यांसाठी अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुलभ व्हावी आणि भरीव स्वरुपाची आंतरक्रिया घडून यावी यासाठी शिक्षकांकडून अनेक उपक्रम राबविले जातात. शिक्षक विद्यार्थी आणि विद्यार्थी विद्यार्थी यांच्यात प्रेम, जिव्हाळा, आपुलकी निर्माण व्हावी, शालेय जीवनापासूनच सौहार्दाचे वातावरण निर्माण व्हावे यासाठी जवळा येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक ढवळे जी. एस., विषय शिक्षक संतोष अंबुलगेकर, सहशिक्षक संतोष घटकार यांच्या मार्गदर्शनाखाली 'माझा वाढदिवस माझा सन्मान' या उपक्रमास प्रारंभ करण्यात आला. या उपक्रमास चिमुकल्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी पालक तथा आकाशवाणीचे प्रासंगिक निवेदक आनंद गोडबोले, मनिषा गच्चे, हैदर शेख, कविता गोडबोले यांची उपस्थिती होती.

माझा वाढदिवस माझा सन्मान या उपक्रमाला विद्यार्थ्यांमध्ये खूपच प्रभावशाली आहे. ज्या वर्गातील विद्यार्थ्यांचा ज्या दिवशी वाढदिवस आहे त्या वर्गातील मुले बुके तयार करतात. ते सर्वच जण इतरांना आमंत्रण देतात. मग सर्वच इयत्तांमधील सर्व विद्यार्थी एकत्र येऊन वाढदिवस साजरा करतात. यानिमित्ताने चॉकलेट्स वाटप करण्यात येतात. आनंदाची देवाणघेवाण होते आणि एकत्वाची भावनाही वाढीस लागते. इयत्तानिहाय व महिन्याप्रमाणे चार्ट तयार करून वर्गाच्या दर्शनी भागात डकविण्यात आला आहे. शैक्षणिक वर्षाच्या अर्धसत्रात जन्मदिनांकाप्रमणे उपक्रम राबविण्यात आला. दीपावली सुट्यांमुळे या उपक्रमास स्थगिती देण्यात आली. दुसऱ्या सत्रात नियोजन करून या उपक्रमास पुन्हा पुन्हा सुरुवात होणार असल्याचे मुख्याध्यापक ढवळे यांनी सांगितले.

# घरकुल मंजूर झालं, पण बांधकाम कसं करायचं ? : घनश्याम मापारी

## रेतीअभवी बांधकाम रखडले

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** राज्य व केंद्र सरकारच्या विविध घरकुल योजनामधून जिल्ह्यातील अनेक गोरगरीब लाभार्थ्यांचे घरकुल मंजूर झालेले आहेत.पण रेतीअभवी बांधकाम रखडले आहे. रिसोड तालुक्यातील रेतीघाटाचे लिलाव रखडल्यामुळे अव्वाच्यासव्वा भावात मिळणारी चोरीची रेती विकत घेणे गोरगरीब लाभार्थ्यांच्या आवक्या बाहेर आहे. परिणामी तालुक्यातील गरजुंचे घरकुल तर मंजूर झाले पण, रेतीशिवाय बांधकाम कसं करायचं? हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या बाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुका समन्वयक घनशाम मापारी यांनी आगामी काळात शासनाने अल्पदरात रेती व मुरून उपलब्ध करून द्यावा.अन्यथा राज्यातील ट्रीपल सरकारच्या विरोधात लाभार्थ्यासह तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा दिला आहे.




राज्य व केंद्र शासनाच्या वतीने गरजू व बेघर लोकांना मोदी आवास योजना, पंतप्रधान आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, यासह इतर आवास योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील बेघर लोकांना त्यांच्या हक्काचे घर देण्यासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणात गाव स्तरावर उद्दिष्ट पुरविण्यात येत आहे. त्याची वेळेत प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी प्रशासनाकडून आढावा घेतल्या जात आहे. मर्यादितवेळेत कामे होण्यासाठी पाठपुरावा केला जात आहे. परंतु घराचे बांधकाम करण्यासाठी गौण खनिजा मधील रेती व मुरुमाची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते. सद्यस्थितीमध्ये रेती घाट बंद आहेत व गौण खनिज उत्खननावर शासनाचे कडक निर्बंध आहेत. त्यामुळे चढ्या दराने रेती व मुरूम खरेदी करणे घरकुलाच्या गरीब व गरजू लाभार्थ्यांना शक्य होत नाही. त्यामुळे गरिबांची कामे मोठ्या प्रमाणात रखडलेली आहेत. एकीकडे शासन बेघर लोकांना घरे देण्याच्या वल्गना करीत असताना, दुसरीकडे रेती मुरूम उत्खननावर कडक निर्बंध लादून शासन गरिबांना तोंड दाबून बुक्क्याचा मार देत असल्याचा आरोप मापारी यांनी केला आहे.राज्यातील तीन चाकी सरकार जाणीवपूर्वक गोरगरिबांची कुचंबना करीत असल्याचा देखील घणाघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुका समन्वयक मापारी यांनी राज्य सरकारवर केला आहे.लाभार्थ्यांना अल्प दरात रेती व मुरूम उपलब्ध करून द्यावा अन्यथा लाभार्थ्यासह शासनाच्या विरोधात तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभे केले जाईल अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व अजितदादा पवार यांना पत्राद्वारे केली असल्याची माहिती घनश्याम मापारी यांनी दिली आहे.

# आ. हरिभाऊ बागडे यांची मराठा सेवक सुनील कावळे यांच्या परिवाराला मदत

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दि.२३ मराठा आरक्षणासाठी बलिदान दिलेल्या मराठा सेवक सुनील कावळे यांच्या घरी आमदार श्री. हरिभाऊ बागडे (नाना) यांनी भेट देत, त्यांच्या स्वतः ची कावळे परिवाराला एक लक्ष रुपयाची आर्थिक मदत धनादेशा द्वारा अंजना सुनील कावळे यांच्या नावे देत, कावळे यांचा मुलगा नागेश सुनील कावळे याला उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती छत्रपती संभाजीनगरच्या आस्थापनेवर कनिष्ठ लिपिक या पदावरील नियुक्तीपत्र सुनील कावळे यांच्या पत्नी अंजनाताई कावळे व मुलगा सुनील कावळे यांना माजी विधानसभा अध्यक्ष तथा फुलंब्री विधानसभा मतदारसंघाचे आमदार हरिभाऊ बागडे (नाना), उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राधाकिसन पठाडे, संचालक भागचंद (नाना) ठोंबरे व मनोज गायके, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रामू काका शेळके यांनी संपुर्द करत, सुनील कावळे यांच्या नावे असलेले पीक कर्ज व इतर कर्जाबाबतची माहिती घेत त्या विषयातही बँकेकडून मदत करून घेण्याचे व शासनाकडून मिळणारी मदत कावळे कुटुंबीयांना लवकरात लवकर मिळवून देण्यासाठी आपण पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.



कावळे यांच्या अंत्यविधी दिवशी हरिभाऊ बागडे (नाना) यांच्यासोबत घडलेल्या प्रकाराबद्दल उपस्थितांनी खेद व्यक्त केला,त्यावेळी हरिभाऊ बागडे (नाना) यांनी सार्वजनिक जीवनात वैयक्तिक व राजकीय राग काढण्यासाठी काही मंडळी अशा संधीची वाट बघत टपून बसलेली असतात, त्यामुळे त्याचं वाईट वाटून घेण्याचं कारण नसल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी दीपक खोतकर, किसन ठुबे, मोहन नाना साळवे, जगदीश गायकवाड, बंडू ठुबे, अक्षय मुळे, शिवाजी कावळे, चिकन पाटील, कावळे कुटुंबीय व नातेवाईक उपस्थित होते.

# विद्यार्थिनींना केले तासभर स्वच्छतागृहात बंद

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** सॅनिटरी पॅडची योग्य विल्हेवाट लावली नाही म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिकेने २३ विद्यार्थिनींना एक तास स्वच्छतागृहात बंद करून ठेवल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. स्वच्छतागृहातील दुर्गंधीमुळे दोन विद्यार्थिनी चक्कर येवून पडल्या तर काहींना उलटी, ओकाऱ्या झाल्या. या प्रकारामुळे शैक्षणिक वर्तुळात खळबळ उडाली आहे. येथील अष्टभूजा प्रभागात नटराज इंग्रजी स्कूल आहे. या शाळेत शुक्रवार ३ नोव्हेंबर रोजी वर्ग सात ते दहावीच्या २३ विद्यार्थिनींना सॅनिटरी नॅपकीनची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावली नाही म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सरकार यांनी स्वच्छतागृहात एक तास बंद करून ठेवले. सलग एक तास स्वच्छतागृहात राहिल्याने जीव गुदमरला असता दोन विद्यार्थिनींना चक्कर आली तर इतर विद्यार्थिनींना उलट्या झाल्या. दरम्यान पीडित विद्यार्थिनींनी हा प्रकार घरी कुटुंबियांना सांगितला. तसेच युवा सेना जिल्हाध्यक्ष विक्रांत सहारे यांना या घडल्या प्रकाराची माहिती देण्यात आली. पालक व विद्यार्थिनींची तक्रार येताच युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष सहारे व युवती सेना जिल्हा प्रमुख रोहिणी पाटील यांनी थेट शाळेत धडक दिली. यावेळी पालक व युवा सेना कार्यकर्त्यांनी मुख्याध्यापिका सरकार यांना धारेवर धरले. सुरुवातीला मुख्याध्यापिका सरकार यांनी असला कुठलाही प्रकार घडलाच नाही असे म्हणून टाळाटाळ केली. मात्र, विद्यार्थिनींनी मुख्याध्यापिकेला जाब विचारताच अखेर श्रीमती सरकर यांनी चूक मान्य केली. या प्रकरणाची तक्रार आता जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांनादेखील करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकरणी शाळा व्यवस्थापनावर गुन्हा दाखल करावा, अशीही मागणी केली जात आहे. तर मुलींना स्वच्छतेचे महत्त्व कळावे म्हणून अशा प्रकारची शिक्षा दिली, असे मुख्याध्यापिका सरकार सांगत आहेत. एकूणच हा प्रकार गंभीर आहे. तेव्हा कठोर शिक्षा करावी, अशी पालकांची मागणी आहे.

# भविकांनी जेजुरीत अर्पण केलेला घोडा नाशिकच्या खंडोबा मंदिरास भेट

आधुनिक केसरी न्यूज

**जेजुरी :** श्रीक्षेत्र मल्हारगड जेजुरी या ठिकाणी भाविकाने मोठ्या श्रद्धापूरवक देवाला अर्पण केलेला अश्व विधीवत श्री क्षेत्र प्रति जेजुरी, पाचोरा वणी, तालुका निफाड जिल्हा नाशिक येथे नव्याने होणाऱ्या श्री खंडेराय मंदिराला जेजुरी देवसंस्थान ट्रस्टच्या वतीने भेट देण्यात आला. श्री मार्तंड देव संस्थानच्या एका भाविकाने मल्हार गडावर एका अश्वाला खंडेरायाला अर्पण केला. त्याचे नाव मल्हार असे ठेवण्यात आले होते. या अगोदरच देव संस्थान कडे दोन मानाचे अश्व होते. जेजुरी खंडोबाचे पारंपरिक उपासक पानसरे परिवरच्या वतीनेही जेजुरी खंडोबा देवास दरवेळी पंचकल्याणी अश्व अर्पित केले जात असते. हा अर्पण केलेला अश्व आम्हाला मिळावा यासाठी पाचोरा वनी नाशिक मंदिर विश्वस्तांनी यांनी श्री मार्तंड देव संस्थान कडे विनंती केली. यावर विश्वस्त मंडळांमध्ये चर्चा होऊन सह धर्मादाय आयुक्त सुधीर कुमार बुके यांचे मतही घेण्यात आले . त्यांनी सकारात्मकता दाखवल्यानंतर आज मल्हार अश्व स्वीकार करण्यासाठी नाशिक वरून जवळपास शंभरहून अधिक सेवेकरी जेजुरीला आले होते. यावेळी नाशिक मंदिराचे संस्थापक योगेश महाराज गवारे यांनी श्री मार्तंड भैरवाचे दर्शन घेऊन विधिवत पूजन करून अश्व स्वीकार केला. श्री मार्तंड देव संस्थांचे प्रमुख विश्वस्त पोपटराव खोमणे, मंगेशराव घोणे, राजेंद्र खेडेकर यांनी देव संस्थांच्या वतीने आश्व भेट दिला . यावेळी अनेक भाविक तसेच राजेंद्र जगताप, गणेश ढिकले, सतीश घाडगे संतोष खोमणे महेश नाणेकर, महेश शिंदे, सतीश दोडके इत्यादी कर्मचाऱ्यांसह नाशिक मंदिर येथील संतोष गवारे, दत्तु गवांदे , गोरख पगार, संदीप गवारे, अमोल कदम, डॉ. सुधीर भांबर, डॉ. संदीप वाघ व जवळपास शंभर सेवेकरी उपस्थित होते. अश्वाची विधिवत पूजा करून त्याच्यावर भांडार खोबऱ्याची उधळण करत येळकोट येळकोट, जय मल्हारच्या जय घोष करत अश्वाला सजवलेल्या रथावर स्वार केले आणि त्यानंतर अश्व व सजवलेल्या रथाचे नाशिककडे निर्गमन झाले. रात्री नाशिक पाचोरा आणि आजूबाजूच्या गावात जवळपास हजारो भाविकांनी आश्वाचे स्वागत करून जल्लोष साजरा केला.



# ‘व्हॉइस ऑफ मीडिया’च्या लोगोचे प्रकाशन

## ज्येष्ठ नेते शरद पवार, मुख्यमंत्री, कृषिमंत्री यांची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** देशभरातील क्रमांक एकची संघटना असलेल्या ‘व्हॉइस ऑफ मीडिया’ या राष्ट्रीय संघटनेचे महाराष्ट्र राज्य शिखर अधिवेशन येत्या 18 व 19 नोव्हेंबरला बारामती येथील गदिमा सभागृहात पार पडणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, यांच्या हस्ते कृषी मंत्री दादा भुसे, मंत्री शंभूराजे देसाई यांच्या उपस्थितीत या अधिवेशनाच्या लोगोचे नुकतेच प्रकाशन करण्यात आले. यावेळी संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, कोषाध्यक्ष चेतन बंडेवार, मंत्री शंभूराजे देसाई व संघटनेच्या राज्य कार्यवाहक यास्मिन शेख प्रामुख्याने उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी देखील लोगोचे प्रकाशन केले. बारामती येथे होणाऱ्या या अधिवेशनाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार यांच्यासह अनेक मान्यवरांची या अधिवेशनाला उपस्थिती राहून मार्गदर्शन करणार आहेत. याशिवाय ज्येष्ठ पत्रकारांना जीवन गौरव पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. या अधिवेशनाला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, खासदार सुप्रियाताई सुळे, माजी मुख्यमंत्री तथा ज्येष्ठ नेते सुशील कुमार शिंदे पृथ्वीराज चव्हाण यांची देखील उपस्थिती व मार्गदर्शन लाभणार आहे. अधिवेशनाची वेगाने तयारी होत असून अधिवेशनाला येणाऱ्या पत्रकारांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेतली जात आहे.




**संघटनेची कामगिरी कौतुकास्पद :** जेमतेम तीन वर्षाच्या काळात संघटनेने पत्रकारांसाठी व त्यांच्या समस्या निवारण्यासाठी केलेले नियोजन महत्त्वपूर्ण असून शासन दरबारी पाठपुरावा देखील वेगाने होत आहे. या अधिवेशनातून राज्यभरातील पत्रकारांच्या समस्या जाणून घेता येतील व त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल. **मुख्यमंत्री**

**तळमळ महत्वाची :** मोजकेच पत्रकार वगळता राज्यातील हजारो पत्रकार बांधवांना अनेक समस्या, अडचणींचा सामना करावा लागतो. त्यासाठी ‘व्हॉइस ऑफ मीडिया’च्या माध्यमातून होत असलेले प्रयत्न व विशेष म्हणजे पत्रकारांबद्दलची तळमळ ही महत्त्वाची बाब आहे. अधिवेशनातून त्यांच्या समस्यांना निश्चितच वाचा फुटेल. आमच्यासारख्या नेत्यांनाही एकाच वेळी हजारो पत्रकारांना भेटता येईल याचा आनंद आहे. **शरद पवार**

# रेल्वेतून विनातिकीट प्रवास महागात! ५ कोटी ६४ लाखांचा दंड वसूल

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागात विनातिकीट प्रवास करणाऱ्या फुकट्या प्रवाशांविरुद्ध रेल्वेच्या वाणिज्य विभागाने धडक मोहीम सुरू करून ऑक्टोबर महिन्यात एकूण ७४ हजार विनातिकीट प्रवाशांवर कारवाई केली असून त्यांच्याकडून तब्बल ५.६४ कोटी रुपयांचा दंड वसूल केला आहे.

या कारवाईने फुकट्या प्रवाशांचे धाबे दणाणले आहेत. प्रामुख्याने गर्दीची रेल्वे स्थानके बडनेरा, अकोला, खंडवा, भुसावळ, मनमाड आणि नाशिक या रेल्वे स्थानकांवर तिकीट तपासणी करण्यात आली. रेल्वेकडून सातत्याने तिकीट तपासणीची मोहीम सुरू आहे. या मोहिमेत ऑक्टोबरमध्ये ७४ हजार प्रवासी विनातिकीट प्रवास करताना आढळून आले, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या मोहिमेतून रेल्वेच्या भुसावळ विभागाला ५ कोटी ६४ लाख रुपयांचा महसूल मिळाला आहे. या तपासणी मोहिमेदरम्यान पथकांमध्ये रेल्वे अधिकारी, तिकीट निरीक्षक, वाणिज्य आणि व्यावसायिक अधिकारी वर्ग, रेल्वे सुरक्षा दलाचे जवान यांचा समावेश होता. रेल्वे प्रवाशांनी प्रवासासाठी तिकीट घेऊनच प्रवास करावा, तिकीट खरेदी करण्यासाठी मोठी रांग असेल तर आपला वेळ वाचविण्यासाठी रेल्वेच्या युटीएस अॅपचा उपयोग करावा, योग्य तिकीट खरेदी करून रेल्वे प्रवास करावा, असे आवाहन मध्य रेल्वेने केले आहे.

# उद्योगवाढीसाठी मोरवा विमानतळाची धावपट्टी विकसित करा : किशोर जोरगेवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** पूर्व विदर्भातील औद्योगिक जिल्हा म्हणून ओळख असलेला चंद्रपूर जिल्हा हा औद्योगिक दृष्ट्या वेगाने विकास करतो आहे. रस्ता, रेल्वे मार्गे हा जिल्हा सगळ्याच बाजूंना जोडलेला असला तरी हवाई वाहतुकीच्या दृष्टिने मात्र चंद्रपूर ला आजही नागपूर किंवा मुंबईलाच धाव घ्यावी लागते. ही बाब लक्षात घेऊन आमदार किशोर जोरगेवार यांनी चंद्रपूरपासून अवघ्या काही अंतरावर असलेल्या मोरवा येथील विमानतळावर असलेली धावपट्टी विकसीत करण्याची मागणी थेट विधानसभा अध्यक्ष राहूल नार्वेकर यांच्याकडे केली आहे. चंद्रपूर हा औद्योगीक जिल्हा आहे. येथे अनेक उद्योग आहे. त्यामुळे या उद्योगांना पुरक असे नवे उद्योग या जिल्ह्यात उभे राहु शकतात ही बाब लक्षात घेत येथील



उद्योग वाढीसाठी चंद्रपूर येथील मोरवा विमानतळाची धावपट्टी व्यावसायिक विमाने उतरण्याच्या दृष्टीने विकसीत करण्यात यावी अशी मागणी मुंबई मंत्रालय येथे राज्याचे विधानसभा अध्यक्ष मा. राहुल नार्वेकर यांची भेट घेतली असून या भेटी दरम्यान सदर मागणी केली आहे. मोरवा येथील विमानतळाचा विकास झाल्यास या औद्योगिक जिल्ह्याला थेट हवाई वाहतुकीची सोय उपलब्ध होणार आहे. त्यामुळे आमदार जोरगेवार यांनी केलेल्या या मागणीचे औद्योगिक क्षेत्रातील मान्यवरांसह चंद्रपूरकरांनीही स्वागत केले आहे.

# शेतकऱ्यांना दिवसा आठ तास वीज द्या; मंजूर झालेल्या सब स्टेशनचे काम तत्काळ सुरू करा

## नंदकिशोर मापारी यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** यावर्षी पावसाने दडी मारल्याने यंदा शेतकऱ्यांना खरीप हंगामात अपेक्षित उत्पादन झाले नाही. तालुक्यात आधिच दुष्काळ पडला आहे. आता गोरगरीब शेतकऱ्यांची सारी आशा रब्बीवर टिकून आहे. तालुक्यात सद्या विजेच्या समस्याने शेतकरी व सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले आहे, दिसभरात अनेक वेळा लाईन जात असल्याने नागरिक त्रस्त झाले आहे. अनेक दिवसांपासून लोणारसाठी २२० केव्हीचे सबस्टेशन मंजूर झालेले आहे परंतु आजून त्याचे काम सुरू झाले नाही. २२० केव्ही सबस्टेशन लवकर काम सुरू करून ते सुरू केल्यास लोणार तालुक्यातील विजेची समस्या मिटेल. तालुक्यातील गंधारी शारा,



वझर आघाव, चिंचोली सांगळे या गावातील शेतकऱ्यांनी ४ नोव्हेंबर ला सबस्टेशनला येऊन आपल्या व्यथा मांडल्या. त्यांनी शेतकरी बांधवांना होणाऱ्या लाईनच्या समस्या तात्काळ सोडून नियमित लाईन द्यावी असे यावेळी सांगितले. तसेच देऊळगाव कुंडपाळ, सरस्वती अंजणी, या गावात नवीन ३३ केव्हीचे सबस्टेशन तात्काळ सुरू करा तसेच टिटवी, देऊळगाव कुंडपाळ, किंनगाव जटू, सुल्तानपूर या ठिकाणी नवीन पावर ट्रान्सफार्मर सुरू करण्यात यावे अशी मागणी यावेळी शिवछत्र मित्र मंडळाचे अध्यक्ष नंदकिशोर मापारी यांनी सबस्टेशनला जाऊन केली. यावेळी शहर प्रमुख पांडुरंग सरकटे, पांडुरंग मुंडे, रामेश्वर सांगळे व गंधारी, वझर आघाव, येवती चिंचोली सांगळे येथील गावकरी मंडळी उपस्थित होते.

# संशोधक विद्यार्थी कृती समितीची गोंडवाना विद्यापीठाला धडक

## पीएच. डी. प्रक्रिया दोषरहित व गतिमान करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** विविध बातम्यांनी कायम चर्चेत राहणाऱ्या गोंडवाना विद्यापीठात संशोधक विद्यार्थ्यांच्या समस्यांची आज भर पडली. संशोधन कार्य करण्यासाठी पुर्ण वेळ किंवा अंशकालीन सेवेत राहून प्रयत्न करणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांना अवास्तव शुल्का सोबतच संशोधनाबाबत विविध समस्यांना सामोरे जावे लागत होते. यामुळे त्रस्त झालेल्या संशोधक विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन आल्या समस्या कुलगुरुंसमोर मांडण्यासाठी विद्यापीठाच्या सिनेट सदस्यांसह आज थेट गोंडवावाना विद्यापीठावर धडक दिली.

सिनेट सदस्यांच्या पुढाकारातून गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे कुलगुरू, प्र-कुलगुरू, सिनेट सदस्य तथा विद्यापीठातील संशोधक विद्यार्थी यांच्यामध्ये बैठक पार पडली. या बैठकीमध्ये संशोधक विद्यार्थ्यांनी पी.एच. डी. प्रक्रियेसंदर्भात अनेक समस्या कुलगुरुंसमोर मांडल्या. विद्यापीठात मागील अनेक वर्षेपासून पीएचडी विभागात पीएचडी करीता विसंगत व अतिरिक्त कठोर नियम करण्यात आले होते. त्यावर या बैठकीत सखोल चर्चा झाली. त्या सर्व समस्यांना सकारात्मक घेत संशोधक विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या मान्य करण्याचे आश्वासन कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी दिले.



यावेळी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे, मानव्यविज्ञा शाखेचे अधिष्ठाता डॉ. चंद्रमौली, सिनेट सदस्य डॉ. विवेक गोरलावार, डॉ. सतीश कन्नाके, डॉ. प्रवीण जोगी, डॉ. मिलिंद भगत, डॉ. नरवाडे, डॉ. दिलीप चौधरी, तथा संशोधक विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत पी.एच.डी. प्रक्रिया युजीसी ऑर्डीनंस मधे जे नियम नमूद आहेत त्याच नियमांच पालन करून राबवावी, याबाबत चर्चा झाली. बैठक आटोपताच लगेच या विषयावर समिती नेमून बैठक घेण्यात आली. व या बैठकीत युजीसी ऑर्डीनंस नुसार विद्यापीठाच्या विद्यमान नियमात बदल करण्यात येणार आहेत.
यामधे युजीसी ऑर्डीनंस नुसार अंशकालीन, पुर्ण वेळ विद्यार्थ्यांना शोध प्रबंध सादर करण्याचा कालावधी कमीतकमी सरसकट तीन वर्षे करण्यात यावा, संशोधन दरम्यान रिसर्च पेपर प्रकाशित करणे ही बाब ऐच्छिक करणे किंवा किमान एक रिसर्च पेपर प्रकाशित करण्याची अट ठेवण्यात यावी, त्यात निव्वळ युजीसी केअर लिस्टेड जर्नल मधेच रिसर्च पेपर प्रकाशित व्हावा, ही अट ठेवू नये, पीयर रीव्हिव किंवा इतर जर्नल स्वीकारावे, युजीसी ऑर्डीनंस शी विसंगत असलेली दि. ३० डिसेंबर २०२१, दि. ०५ ऑगस्ट २०२२, दि. २५ जुलै २०२३ चे परिपत्रक व अधिसूचना तात्काळ रद्द करण्यात यावे, संशोधन कालावधी तीन वर्षे पूर्ण झाल्यावर तीन महिन्याच्या आत सबमिशन प्रक्रिया ज्यामधे प्री-सबमिशन व्हायवा, पी. आर. रिपोर्ट, प्लैगरीझम थेसिस सबमिशन पूर्ण व्हावी, व पीएचडी विभागात थेसिस सबमिट केल्यापासून एक महिन्याच्या आत आरआरसी लागावी, याकरीता कालमर्यादा ठरवून द्यावी, पीएचडी करतांना विद्यापीठात पीएचडी विभाग व रिसर्च सेंटरवर प्रत्येक पायरीला जे अवाढव्य शुल्क भरावे लागते, ते कमी करण्यात यावे, आरआरसी नंतर थेसिस परीक्षण करीता राज्याबाहेरील व राज्यातील सब्जेक्ट एक्स्पर्ट कडे थेसिस ताबडतोब पाठवावेत, संशोधक विद्यार्थी हे पीजी, नेट, सेट करून पीएचडी करतात म्हणून त्यांना रिसर्च सेंटर व पीएचडी विभाग येथे सन्मानजनक वागणूक मिळावी, आदी मागण्यांवर या बैठकीत चर्चा झाली व यावर कुलगुरूंनी सकारात्मकता दाखवून मागण्या मान्य करण्याचे आश्वासन दिले.
विद्यापीठाच्या सकारात्मक निर्णयाचे रविकांत वरारकर, मोहित सावे, अमोल कुटेमाटे, सुनील चिकटे, सोहम कोल्हे, जगदीश चिमुरकर, राहुल लभाने, नाहिद एन. हुसेन, संतोष कावरे, अमर बलकी, किशोर महाजन, विठ्ठल चौधरी, बर्डे सर, स्वप्नील ढोमणे, डेव्हिड बनसोड, अनिल पेटकर, मनोज वारजुरकर, नितेश पुण्यप्रेड्डीवार, गणेश येरगुडे, अतुल बारसागडे, चरित्र नागराळे, अमोल बोरकुटे, गणेश उपरकर, महेश यार्दी, मोहनीश माकोडे, रीना लोणारे, लिपिका रॉय, अनुपमा मॅडम, प्रिती बोबडे, अमोल ठाकरे, महेश काकडे, मोहनीश माकोडे, आशिष देरकर, शुभांगी भेंडे शर्मा, संदीप आर. देशमुख, लक्ष्मीकांत कापगते, राजाराम साळुंके, गजानन वि ढोले, अविनाश डी. भुरसे, आदी अनेक संशोधक विद्यार्थ्यांनी स्वागत केले आहे.

# लाखांच्या फार्महाऊसमध्ये ३६ कोटींचे ड्रग्ज

## अमली पदार्थ माफियांकडून दुर्गम भाग लक्ष्य, सिव्हिल कॉन्ट्रॅक्टरच बनवत होता ?

आधुनिक केसरी न्यूज

**अमोल टोपले**

**पालघर :** नाशिकमधील ड्रग्जमाफिया ललित पाटील याचा कारखाना शहरापासून दूर शिंदे गावात आढळून आला. छत्रपती संभाजीनगर, सोलापूर तसेच पालघर जिल्ह्यातील मोखाडा येथे एका फार्म हाऊसवर ३६ कोटींचे ड्रग्ज पकडल्याने ग्रामीण भागात ड्रग्ज कारखाने उभारून आणि त्याचे वितरण शहरी भागात करून, तरुण पिढीला नशेच्या जाळ्यात अडकवले जात असल्याचे पोलिस कारवाईत स्पष्ट झाले आहे. सध्या ज्या पद्धतीने महाराष्ट्रात दररोज ड्रग्ज बनविण्याचे रॅकेट उघडकीस येत आहेत, त्याप्रमाणे पाहिल्यास हे रॅकेट राज्याला कवेत घेऊ पाहतेय की काय, असा प्रश्न यानिमित्ताने उभा राहत आहे. या सर्वातील गंभीर बाब म्हणजे मोखाडासारख्या दुर्गम भागात कावळपाडा गावानजीक फार्म हाऊसवर हा साठा सापडला. त्याची एकूण किंमत १० लाख रुपयांच्या पुढे नसेल; मात्र याच 'लाखांच्या फार्म हाऊसवर तब्बल ३६ कोटी ९० लाख ७४ हजार आंतरराष्ट्रीय बाजारभावाचे एमडी मेफेड्रान हा अमली पदार्थ सापडला. मुळात या फार्म हाऊससाठीची जागा अवघ्या साडेतीन लाखात घेतल्याचे आता समोर येत असून याठिकाणी एक हॉल, बेडरूम किचन असलेले पत्र्याचे घर बांधण्यात आले. मात्र गेल्या दोन वर्षांपूर्वी ड्रग्ज बनविण्यासाठी एक वेगळी छोटी रूम तयार करण्यात आली होती. त्या रूममध्येच हे ड्रग्ज बनवणारे आरोपी कधी यायचे, किती दिवस राहायचे याची जराही भगक स्थानिकांना नव्हती. एमडी माणसाला थेट सारे विसरवते, संपवते! कोणत्याही अमली पदार्थाच्या सेवनामुळे त्या



व्यक्तीमध्ये व्यसनासक्ती निर्माण होते. ती व्यक्ती शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या त्या अमली पदार्थाच्या मात्रेवर (डोस) अवलंबून राहते. शरीराच्या पेशींना त्या अमली पदार्थाची सवय लागते. अमली पदार्थ हे प्रामुख्याने मेंदूवर परिणाम करतात. सूत्रांनुसार, एमडी बनविण्यासाठी केटामाईन तसेच कॅन्सरवर पेनकिलर म्हणून उपचार करणाऱ्या एका औषधाची मात्रा वापरली जाते. याच्या सेवनाने मेंदूच्या पेशींच्या कार्यात विघाड होतो. ड्रग्जच्या आहारी गेलेल्या व्यक्ती एकलकोंड्या असतात. एमडी सेवन केलेला व्यक्ती खूप सैरभैर होतो. काही स्टिम्युलन्स' असे असतात की, त्यामुळे त्या व्यक्तीला आपण हवेत तरंगत आहोत, असे वाटते. पण हेच व्यसन त्याचे काही महिन्यांत आयुष्य संपवते. संयुक्त राष्ट्र संघाच्या एजन्सीच्या मते, जगभरात सुमारे २३४ दशलक्ष लोक या अमली पदार्थाचे सेवन करतात. तर दरवर्षी सुमारे २ लाख लोक या अमली पदार्थामुळे आपला जीव गमावतात.

# घुग्गुस येथील भूस्खलनाचा धोका असलेल्या 160 कुटुंबांचे होणार पुनर्वसन

## मुनगंटीवार यांच्या प्रयत्नामुळे सहा एकर जागा उपलब्ध

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** वेकोलिच्या खाणींमुळे भूस्खलनाचा धोका असलेल्या



घुग्गुस येथील 160 कुटुंबाचे नवीन जागेवर पुनर्वसन होणार आहे. या कुटुंबीयांना निवाऱ्यासह सर्व मूलभूत सोयी-सुविधा देण्यासाठी सहा एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. विशेष म्हणजे नवीन जागेवर या कुटुंबीयांच्या पुनर्वसनासाठी राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार हे सुरुवातीपासूनच आग्रही होते. याबाबत त्यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. अखेर त्यांच्या पाठपुराव्याला मोठे यश प्राप्त झाले आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्गुस येथील आमराई वॉर्डात 26 ऑगस्ट 2022 रोजी गजानन मडावी यांचे घर भूस्खलनामुळे 60 ते 70 फूट जमिनीत गेले. या घटनेची पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी तात्काळ दखल घेत प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत घटनास्थळाला भेट दिली. वेकोलिच्या खाणींमुळे परिसरातील इतर 160 घरांनासुध्दा भूस्खलनाचा धोका असल्याचं त्यांच्या निदर्शनास आले. तेव्हापासूनच या सर्व कुटुंबांचे इतर जागेवर पुनर्वसन करण्यासाठी पालकमंत्री मुनगंटीवार यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.

त्यानुसार मौजा घुग्गुस येथील शासकीय जमीन स.न. 29/1, आराजी 59.27 हे. आर. जागेपैकी 2.40 हे. आर. (6 एकर) जागा या 160 कुटुंबांच्या निवाऱ्यासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यांचे योग्य पुनर्वसनाकरीता भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना अधिनियम 2013 मधील तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 30, 31 व 40 आणि महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम 1971 चे नियम 42 (1) (अ) व नियम 45 अन्वये घुग्गुस नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना जमीन उपलब्ध करून देण्याबाबत शासनाची मान्यता देण्यात आली आहे.

घुग्गुस येथील आमराई वॉर्डात झालेल्या भूस्खलनाच्या घटनेची तात्काळ नोंद राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी घेऊन घटनास्थळाला भेट दिली. यावेळी त्यांनी भूस्खलनाचा धोका असलेल्या घरांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून तात्काळ 10 हजार रुपये देण्यात येईल, असा शब्द पीडित कुटुंबाना दिला होता. भूस्खलनाच्या दुर्घटनेप्रकरणी बाधित झालेल्या 160 कुटुंबांसाठी पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी केवळ 10 दिवसांत मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून 16 लक्ष रुपये मंजूर करून आणले होते. सदर रक्कम जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्याकडे वर्ग करण्यात आली व मंजूर अर्थसहाय्यातून प्रत्येक कुटुंब प्रमुखाला 10 हजार रुपये याप्रमाणे 16 लक्ष रुपये तातडीने वाटप करण्यात आले होते.



# रेखाताई बनसोडे यांची विज्ञान, तंत्रज्ञान व कौशल्य विभाग प्रदेश संघटकपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**नायगाव :** आपल्या सामाजिक कामातून अनेकांना परिचित असलेले नायगाव तालुक्यातील मौजे शेळगाव छत्री येथील रेखाताई बनसोडे यांच्या कार्याची दखल घेऊन काँग्रेस पक्षाचे नानासाहेब पटोले यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अंतर्गत विज्ञान तंत्रज्ञान व कौशल्य विभागाच्या महाराष्ट्र प्रदेश संघटक पदी त्यांची नियुक्ती करून नियुक्तीपत्र देण्यात आले आहे.

दिवसेंदिवस विविध पक्षातून काँग्रेस पक्षाकडे कार्यकर्त्यांचा मोठा वर्ग सहभागी होत असताना वंचित बहुजन आघाडी नायगाव तालुका महिला अध्यक्ष रेखाताई बनसोडे यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्याने मुंबई येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नानाभाऊ पटोले, सुरेश यादव यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये रेखाताई बनसोडे यांची विज्ञान तंत्रज्ञान व कौशल्य विभागाच्या महाराष्ट्र प्रदेश संघटक पदी निवड करून त्यांना नुकत्याच संपन्न झालेल्या मुंबईतील कार्यक्रमात नियुक्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले व भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्व हितचिंतक, मित्र मंडळ, विविध बचत गटातल्या महिलांनी रेखाताई बनसोडे यांचे अभिनंदन केले आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर